- ✓ सामाजिक सेवांवरील सरकारी खर्च दुप्पट करा
- ✓ रेशनिंगमध्ये गहू, तांदूळ इ. सोबत डाळी-कडधान्ये व इतर १३ जीवनावश्यक वस्तूंचा समावेश करा
- ✓ रेशनिंग-व्यवस्था सर्वांसाठीः कार्डाची अट नको
- ✓ प्रत्येक वृद्धाला दरमहा किमान २००० रु. पेन्शन
- ✓ अन्न-सुरक्षेवरील सरकारी खर्च दुप्पट करा
- ✓ श्रीमंतांकडून पुरेसे कर उत्पन्न मिळवा व हे वाढीव कर-उत्पन्न सामाजिक सेवांवर अग्रक्रमाने खर्च करा
- ✓ देशाची नैसर्गिक संपत्ती कवडी-मोलाने खाजगी कंपन्यांना विकणे बंद करा
- ✓ कायमस्वरूपी काम करणा-या सर्व कंत्राटी कामगारांना कायम करा.
- ✓ सार्वजनिक - खाजगी भागीदारी या नावाखाली सरकारचे पैसे खाजगी खिशात घालणे बंद करा
- ✓ लोकांसाठीच्या सेवांवर देखरेख ठेवण्यात लोकाचा थेट सहभाग असला पाहिजे
- ✓ दलित, आदिवासी, अल्प-संख्यांक, भटके-विमुक्त, स्त्रिया अशा वंचित घटकांनाही या दर्जेदार सेवा नक्की द्या

**प्रस्तावित सहयोग मूल्यः रु. १५-**

# जगण्याच्या हक्काचं आंदोलन

## भूमिका व मागण्या



# जगण्याच्या हक्काचं आंदोलन

## सामाजिक सेवा, सुरक्षेसाठी...

# भूमिका व मागण्या

जगण्याच्या हक्काचं आंदोलन
भूमिका व मागण्या

**प्रकाशक व मुद्रक**
जगण्याच्या हक्काचं आंदोलन, महाराष्ट्र

**मुद्रणस्थळ**
आर. एस. प्रिंटर्स, ४५५, शनिवार पेठ, पुणे

**संपर्क पत्ता:**
श्रमिक, डेंगळे पुलाजवळ,
फायनल प्लॉट नं. ८२२,
शिवाजीनगर, पुणे - ४११००५

**संपर्क फोन:**
मेधा थत्ते ९४२२५ ३०१८६
डॉ. अभिजित मोरे ९४२०२ १८७८९

# प्रस्तावना

'जगण्याच्या हक्काचं आंदोलन' या अभिनव आंदोलनाचे काय म्हणणे आहे व ते कोणते विश्लेषण, पुरावा यावर आधारलेले आहे हे मांडणारी ही पुस्तिका आहे. शिक्षण, आरोग्य, अन्न सुरक्षा, घरगुती वापरासाठी पाणी आणि सार्वजनिक स्वच्छता, स्थानिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, पेन्शन, रोजगार हमी या सर्व सामाजिक सेवा-सुरक्षा मिळणे हा जनतेचा हक्क आहे. या सेवा पुरवण्याची व्यवस्था उभारणे ही सरकारची जबाबदारी आहे. पण 'आर्थिक सुधारणा'च्या नावाखाली १९९० पासून सरकार 'खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण' (खाउजा) असे 'नव-उदारमतवादी' धोरणे आखत आले आहे. त्यामुळे या सर्व सामाजिक सेवांचे टप्प्या-टप्प्याने, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे खाजगीकरण करून सरकार आपली जबाबदारी झटकत आले आहे. दुसऱ्या बाजूला असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण ९३ टक्के पर्यंत वाढले आहे आणि संघटित कामगार क्षेत्रातसुद्धा कंत्राटी कामगारांचे प्रमाण खूपच जास्त आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांना आणि संघटित क्षेत्रातील कंत्राटी कामगारांना सामाजिक सेवा- सुरक्षांचे कवच नाहीये तसेच सर्वसामान्य जनतेसाठीच्या सामाजिक सेवांच्या व्यवस्था सुद्धा मोडकळीस आल्या आहेत. त्यांचे खच्चीकरण व खाजगीकरण चालू आहे. शासनाच्या या धोरणाच्या विरोधात समाजातील निरनिराराळ्या थरातून अनेक छोटे-मोठे लढे उभारले जात आहेत. अन्न सुरक्षा कायद्यासाठीचे अभियान, पेन्शनच्या मागणीसाठीचा लढा, आरोग्यसेवांसाठीचे अभियान, शिक्षणाच्या खाजगीकरणाविरूद्धचे आंदोलन, पिण्याच्या पाण्यासाठीची आंदोलने इत्यादी अनेक आंदोलने राज्यात होत आहेत. त्याला राज्य शासनाचा असलेला प्रतिसाद हा मात्र अतिशय थंड आणि असंवेदनशील असा आहे. या बाबत चर्चा करत असताना काही कार्यकर्त्यांनी मांडले की आतापर्यंत आपण एकेकट्या मुद्द्यांवर आधारित, एकेकटी लढणारी अशी आंदोलने त्या त्या विषयावर (रेशनिंग, नागरी पाणी-पुरवठा, शिक्षण, आरोग्यसेवा इ.) त्या त्या मागण्यांभोवती संघटित केली. पण सामाजिक सेवा पुरवण्याबाबत सरकारचे धोरण या सर्व मागण्यांबाबत समान व नकारात्मक आहे. त्यामुळे आपणही एकजूट करून हे सरकारचे धोरण बदलण्यासाठी एकत्रितपणे लढा द्यायला हवा. या विचाराने अन्न-सुरक्षा अभियान व जन आरोग्य अभियान यांनी १३ मार्च, २०१३ रोजी मुंबईत विधानसभेसमोर



दिवसभराचे धरणे धरले. या धरण्याच्या वेळी तयार झालेली एकजुटीची भावना, वाढलेला उत्साह लक्षात घेता असा प्रस्ताव मांडला गेला की या निरनिराळ्या सामाजिक सेवांसाठी निरनिराळ्या संघटनांच्या मार्फत लढणाऱ्यांनी सामाईक मुद्द्यांवर एकत्रितपणे लढण्याबाबत विचारविनिमय करण्यासाठी एक महाराष्ट्रव्यापी बैठक बोलवावी.

या पार्श्वभूमीवर 'जागतिकीकरण विरोधी कृती समिती', 'जन आरोग्य अभियान' आणि 'अन्न अधिकार अभियान' तर्फे एकत्रितपणे जून व जुलै २०१३ मध्ये एकत्र येण्यासाठी एक आवाहन केले गेले. शासनाच्या सामाजिक सेवांच्या खाजगीकरणाच्या धोरणाला ज्यांचा विरोध आहे, आणि सर्वांना हक्क म्हणून चांगल्या दर्जाच्या सामाजिक सेवा शासनाने देण्याची व्यवस्था करायला पाहिजे अशी ज्यांची भूमिका आहे, अशात तमाम जन संघटनांना, असंघटित कष्टकऱ्यांच्या संघटनांना, ट्रेड युनियन्सना, राजकीय पक्ष आणि गटांना, सामाजिक चळवळींना, हक्काधारित दृष्टिकोनातून काम करणाऱ्या गटांना आणि सजग नागरिकांना एका महाराष्ट्रव्यापी बैठकीला निमंत्रित केले गेले. त्याला फार चांगला प्रतिसाद लाभला. १० व ११ ऑगस्ट, २०१३ रोजी पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत सुमारे महाराष्ट्रभरच्या सुमारे १५० कार्यकर्त्यांनी भाग घेऊन सामाजिक सेवा व सुरक्षा या बाबतच्या सर्व मुद्द्यांची सांगोपांग चर्चा केली. त्यातून खालील सामाईक मुद्दे निघाले- 'सरकार जास्त पैसा खर्च करू शकत नाही' असे खोटे कारण सांगत अत्यंत तुटपुंजा सरकारी निधी देऊन व इतर मार्गाने सार्वजनिक सेवांचे खच्चीकरण करणे; त्यांचे खाजगीकरण, बाजारीकरण, कंत्राटकीकरण करणे; या सेवा फक्त 'अधिकृत' गरिबांनाच मोफत देण्याचे धोरण घेणे इत्यादी. या सामाईक मुद्द्यांबाबत स्थानिक पातळीपासून राज्य पातळीपर्यंत एकत्रितपणे लढा उभारण्यासाठी 'जगण्याच्या हक्काचं आंदोलन...सामाजिक सेवा सुरक्षेसाठी' या व्यापक आघाडीची स्थापना या बैठकीत करण्यात आली. तसेच विविध संघटनांच्या प्रतिनिधींची मिळून ११ जणांची निमंत्रक-समितीही नेमण्यात आली. अन्न-सुरक्षा व पोषण, घरगुती वापराचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता, शिक्षण, आरोग्यसेवा, स्थानिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था या सार्वजनिक सेवा तसेच रोजगार हमी, पेन्शन या सार्वजनिक सुरक्षा या बाबतच्या सामाईक मुद्द्यांवर ही आघाडी लढा देईल असे ठरले. या पुण्यातील बैठकीनंतर मुंबई, ठाणे, रायगड व नवी मुंबई, पुणे, सांगली, नागपूर येथे जिल्हापातळीवर कार्यकर्त्यांची प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली. २४ फेब्रुवारी, २०१४ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे 'धोरण बदला परिषदे'चे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि असंघटित कामगारांचे नेते डॉ. बाबा आढाव हे प्रमुख पाहुणे होते तर संघटित कामगारांची 'कामगार संघटना संयुक्त कृती समिती (महाराष्ट्र)चे समन्वयक कॉ. ए.

डी. गोलंदाज हे या परिषदेच्या अध्यक्षस्थानी होते. परिषदेला महाराष्ट्रातील ठिकठिकाणच्या संघटनांचे मिळून हजारावर कार्यकर्ते, समर्थक या दिवसभरच्या परिषदेत सामील झाले होते.

कार्यकर्ते आणि सजग नागरिक यांना या अभिनव आंदोलनाची भूमिका कळावी तसेच सामाजिक सेवा व सुरक्षेबाबत पुरेशी माहिती मिळावी याकरिता या सर्व पार्श्वभूमीवर सदर पुस्तिका बनवली गेली आहे. सामाजिक कार्यकर्ते हे फक्त मागण्या करतात आणि त्यांची पूर्तता कशी करावी, लागणारा पैसा कुठून आणावा याबाबत काहीही बोलत नाहीत असा सर्वसाधारणपणे आरोप केला जातो. या पुस्तिकेमध्ये अन्न-सुरक्षा व पोषण, घरगुती वापराचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता, शिक्षण, आरोग्यसेवा, स्थानिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, रोजगार हमी आणि पेन्शन या मुद्द्यांवर सरकारचे धोरण, त्यातील गंभीर दोष, आणि या सामाजिक सेवा-सुरक्षा सर्वांना उपलब्ध करून देण्यासाठी लागणारा पैसा कुठून आणायचा याचे सविस्तर अभ्यासपूर्वक विवेचन दिलेले आहे. या पुस्तिकेतील विविध प्रकरणांचा मसुदा त्या त्या प्रश्नावर काम करणाऱ्या संघटनेतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी लिहिला. या मसुद्यावर 'जगण्याच्या हक्काचं आंदोलन'च्या निमंत्रक समितीत चर्चा होऊन ज्या सूचना आल्या त्यांचा विचार करून पक्का मसुदा बनवण्यात आला.

या पुस्तिकेतील विविध प्रकरणांचा मसुदा लिहिणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार.

कार्यकर्त्यांच्या ज्ञानात व दृष्टिकोनात भर टाकणारी ही पुस्तिका प्रशिक्षणासाठी तर उपयोगी ठरेलच पण जागरूक नागरिकांनाही ती आवडेल तसेच हे आंदोलन येत्या काळात महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय जीवनावर आश्वासक छाप पाडेल आणि सर्वसामान्य जनतेच्या जगण्याच्या हक्काचा आवाज महाराष्ट्रात बुलंद करेल असा विश्वास आम्हाला वाटतो.

पुढील आवृत्तीसाठी जरूर सूचना पाठवाव्या.

**निमंत्रक समिती, 'जगण्याच्या हक्काचं आंदोलन'**



# अनुक्रमणिका


- **प्रस्तावना.....................................................३**

**१. सर्वांकरिता पोषण व अन्नसुरक्षेची हमी द्या...............७**

**२. पाणीः पिण्याचे, घरगुती वापराचे आणि उपजीविकेचे!..१५**

**३. दर्जेदार, आरोग्यसेवा सर्वांना मिळालीच पाहिजे! ती मोफत, संवेदनशील, उत्तरदायी असलीच पाहिजे!!...२१**

**४. सर्वांना मोफत, चांगले, समान दर्जाचे शिक्षण मिळालेच पाहिजे!.............................................२६**

**५. स्वस्त, पुरेशी सार्वजनिक बससेवा सर्वांना मिळालीच पाहिजे! ..........................................३३**

**६. सर्व कष्टकऱ्यांना म्हातारपणी हक्काचे पेन्शन मिळालेच पाहिजे!............................................३९**

**७. रोजगाराची हमी.............................................४२**

**८. जगण्याच्या हक्काचं आंदोलनः सामाजिक सेवा, सुरक्षेसाठी भूमिका व मागण्या...............................५०**

# १ सर्वांकरिता पोषण व अन्नसुरक्षेची हमी द्या

> ***जेव्हा सर्वांना, 'आरोग्यदायी आणि क्रियाशील जीवनासाठी आवश्यक' असा पोटभर (पुरेसा), सुरक्षित आणि पोषक आहार, त्यांची अन्नाची आवडनिवड व गरज भागविण्याकरिता उपलब्ध होण्यासाठी भौतिक व आर्थिक सोयीसुविधा (व्यवस्था) प्रत्यक्षात असतात, तेव्हाच वैयक्तिक, कौटुंबिक, राष्ट्रीय, खंड आणि जागतिक (वैश्विक) पातळीवर अन्नसुरक्षा अस्तित्वात आली असे मानले जाते.***
>
> ***'आपल्या जनतेच्या पोषणाचा स्तर व त्यांचे जीवनमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे ही आपली आद्य (प्राथमिक) कर्तव्य आहेत असे राज्याने (सरकारने) मानावे......'***
>
> ***-राज्यघटनेचे कलम ४७.***

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ६० वर्षांनंतरही, वय वर्षे पाच खालील तब्बल ४२% मुलं कुपोषित आहेत. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी मान्य केले होते की, 'कुपोषणाचा प्रश्न ही राष्ट्रीय शरमेची गोष्ट आहे.' आपल्या (जी.डी.पी.त) सकल राष्ट्रीय घरेलु उत्पादनात लक्षणीय वाढ झालेली असून देखिल देशातील पोषणाची पातळी कमी असण्याचे प्रमाण अपेक्षेपेक्षा फारच जास्त आहे.

'ज्या राज्याने भारतातील सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक पटकावली आहे आणि राष्ट्रीय सकल घरेलु उत्पादनात (जीडीपीत) ज्याचे सर्वाधिक योगदान आहे' अशा महाराष्ट्रात, शासकीय आकडेवारीनुसार मागील चार वर्षात कुपोषणामुळे १,१७,४९३ बालके दगावली (मृत्यूमुखी पडली), म्हणजेच जवळ जवळ ३०,००० दरवर्षी. भारताचा भूक निर्देशांक आणि जागतिक भूक निर्देशांक याप्रमाणे २००८ यावर्षी महाराष्ट्राने मध्यप्रदेश, बिहार आणि गुजरातच्या पाठोपाठ शेवटून चौथा क्रमांक पटकाविला आहे. राज्यात दरवर्षी होणाऱ्या २,८५० मातामृत्यूंपैकी जवळ जवळ ४८० मातामृत्यूंचे कुपोषण हे मूळ कारण आहे. कुपोषणाचे एवढे प्रचंड प्रमाण असूनही राज्य सरकार त्याच्या जीडीपीचा केवळ ०.०८ टक्के एवढाच (अत्यल्प) खर्च एकात्मिक बालविकास योजना आणि माध्यान्ह भोजन या कार्यक्रमांवर करते.

अशा दयनीय परिस्थितीत भारत सरकारने नुकताच अन्न सुरक्षा कायदा २०१३



पारित केला. या कायद्यानुसार भारतातील ६७ टक्के जनतेला दरडोई दरमहा ५ किलो धान्य पुरविण्यात येणार आहे. आधीच्या रेशन व्यवस्थेपेक्षा जरी आता अधिक लोकांना धान्य मिळणार असले तरी सर्वोच्च न्यायालयाने शिफारीस केलेल्या प्रत्येक कुटुंबाला दरमहा ३५ किलो यापेक्षा हे हक्काचे धान्य बरेच कमी आहे. केंद्र सरकार रेशनवर रु. १,२४,००० करोड म्हणजे जीडीपीच्या जवळजवळ १.२ टक्के खर्च करणार असा अंदाज आहे. यात 'माध्यान्ह भोजन' आणि 'एकात्मिक बालविकास' या अन्न संबंधित योजनांच्या खर्चाचा समावेश केला तर जवळजवळ १.५ टक्के जीडीपी खर्च होईल.

या कायद्यानुसार महाराष्ट्रातील एकंदर ११.२४ करोड लोकसंख्येपैकी ७.१७ करोड लोकसंख्येचा यात समावेश होईल. अंत्योदय प्रकारातील कुटुंबांना ३५ किलो धान्य मिळेल, मात्र अन्य सर्व ५ सदस्य असलेल्या कुटुंबांना फक्त २५ किलोच धान्य मिळेल, यापैकी तांदूळ तीन रु. किलो, गहू दोन रु. किलो आणि भरड धान्य (उदा. ज्वारी, बाजरी, मका) एक रुपये किलो दराने दिले जाईल.

या कायद्यामुळे जवळजवळ दुप्पट कुटुंबांपर्यंत धान्य पोहोचेल (दुप्पट कुटुंबांचा समावेश होईल) या दृष्टीने आम्ही कायद्याचे स्वागत करतो. तसेच मातृत्व अनुदानाचे जवळ जवळ सार्वत्रिकीकरण होते आहे, ह्याचेदेखिल आम्ही स्वागत करतो. मात्र या कायद्यात पुरेसे धान्य, डाळी, तेल यासाठी तरतूद केलेली नाही. ठेकेदारांच्या थेट प्रवेशास आळा घालण्यात आला असला तरी व्यापारी हस्तक्षेपाला पूर्ण फाटा दिला गेलेला नाही. रोख भरपाई (हस्तांतरण), आधारकार्डाची सक्ती आणि जी.एम्. (जनुकीय बदल केलेल्या) धान्याचा समावेश अजूनही कायद्याचा भाग आहे. शिवाय नैसर्गिक आपत्तीच्या काळात, जेव्हा जनतेला धान्याच्या मदतीची नेहमीपेक्षा अधिक गरज असते, तेव्हा हक्क रद्द करण्याबद्दलचे, 'फोर्स माज्यरे' कलम स्टॅट्यू बुकात तसेच शिल्लक आहे.

कायद्याच्या कलम १८ मधून असे सूचित होते की, रेशन व्यवस्थेला पर्याय म्हणून रोख लाभ हस्तांतरण मागील दाराने (छुप्या पद्धतीने) रेटले जाऊ शकेल. खाजगीकरणाच्या व्यापक षड्यंत्राचाच हा भाग असावा असे दिसते. नागरिकांना मूलभूत सेवा पुरविण्याची स्वतःची जबाबदारी सरकार हळूहळू झटकून टाकत आहे. कर्जबाजारी गरीब कुटुंबांना रोख रक्कम रूपातील भरपाईतून अन्नसुरक्षा मिळण्याची खात्री होऊ शकत नाही. बाजारभावातील चढउतार व महागाई यापासून ठराविक रोखभरपाईमुळे संरक्षण दिले जात नाही. बायांचे नियंत्रण स्वयंपाकघरात असते पण रोख रकमेवर नसते, म्हणून त्यांची शक्ती (सत्ता) आणखीनच कमजोर होईल.

महाराष्ट्रात धान्य उत्पादनात यावर्षी जरी ३९% वाढ होण्याचे भाकीत असले तरी सरकार आणि पुरवठामंत्री श्री. अनील देशमुख, या कायद्याच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या खर्चापायी चिंताग्रस्त आहेत. महाराष्ट्राच्या

बजेटमध्ये सन् २०१३-२०१४ सालात रेशनसाठी केवळ रु. ३४८ करोड अशी किरकोळ तरतूद करण्यात आली आहे. मात्र सन् १९९९-२००० या काळात हे बजेट रु. ५५० करोड होते. वाढत्या लोकसंख्येबरोबर बजेटमधील अशी प्रचंड घट हा थोर (घोर) विपर्यासच म्हणावा लागेल.

याउलट महाराष्ट्राच्या तुलनेने बरीच कमी लोकसंख्या असलेली राज्ये उदा. छत्तीसगढ (२००० करोड), तमिळनाडू (४९०० करोड) ओरिसा (१३१२ करोड) कितीतरी जास्त खर्च करतात. ही राज्ये रेशनवर अनेक वस्तु देतात आणि केंद्र सरकारने नेमून दिलेल्या कोट्यापेक्षा किती तरी अधिक कुटुंबांना लाभ पोहोचवतात. छत्तीसगढमध्ये डाळ दहा रुपये किलोने तर चणा पाच रुपये किलोने मिळतो. तमिळनाडूत दोन रुपये दराने धान्य १.६८ करोड रेशन लाभधारकांना दिले जाते, केंद्र सरकारचा कोटा ४८.६३ लाख लाभार्थींचाच असला तरी. केंद्र सरकारने ३९.२९ लाखच बीपीएल् कुटुंब नोदविली असूनही कर्नाटकात राज्य सरकार ९८.१७ लाख बीपीएल् कुटुंबांना एक रुपया किलो दराने ३० किलो तांदूळ देते. जनतेच्या गरजा भागविण्यासाठी ही राज्ये केंद्राने दिलेल्या निधीत राज्याच्या निधीची भर घालून तरतूद करतात.

महाराष्ट्रातील जनतेला योग्य अन्नसुरक्षा देण्यात अनेक निरनिराळे आव्हाने आहेत, जसे-

- लक्षाधारित पद्धत
- लाभार्थी शोधण्यातील प्रश्न
- गळती
- खाजगीकरण
- ठेकेदारीकरण
- पारदर्शकतेचा अभाव
- योग्य देखरेख यंत्रणेचा आणि तक्रार निवारण यंत्रणेचा अभाव

सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य सल्लागारांच्या अहवालात नोंदवले आहे की, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करत, महाराष्ट्रातील 'एकात्मिक बाल विकास योजने'त कंत्राटदार नेमल्यामुळे पूरक आहार पुरवठ्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार (अनियमितता) झालेला आहे.

मूलभूत मुद्दा 'किती धान्याचा अधिकार' हा आहे. प्रत्येक व्यक्तीला दररोज २७०० कॅलरी पुरविण्यासाठी दरडोई ५ किलो हा निर्धारित पुरवठा अगदीच अपुरा आहे. महाराष्ट्रातील भूक व कुपोषणाचा प्रश्न, शेतकरी पुरेसे धान्य पिकवू शकत नाही या कारणामुळे नाही. त्यांना योग्य किमान आधारभूत भाव न देणे आणि सिंचनासारख्या मूलभूत सोयी न पुरवणे यामुळे प्रश्नांची गुंतागुंत वाढते आहे.

सर्वांना दर्जेदार व पोषक अन्न मिळण्याची हमी मिळण्याकरिता म्हणून आम्ही



पुढील मागण्या मांडतो आहोत.

### ■ अन्न सुरक्षेच्या लाभांच्या सार्वत्रिकीकरणाची हमी द्या.

केंद्र सरकारने जरी ग्रामीण भागातील ४.७ करोड (७६.३२ टक्के) आणि शहरी भागातील २.३ करोड (४५,३४ टक्के) लाभ देण्याचे मान्य केले असले तरी, आम्ही मागणी करतो की, अन्य पुरोगामी राज्यांप्रमाणे महाराष्ट्राने स्वत.च्या निधीची भर घालून रेशनचे (सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे) सार्वत्रिकीकरण करावे. गेल्या अनेक दशकांच्या अनुभवातून लक्षाधारित पद्धतीमुळे लाखो खरे योग्य लोक लाभांपासून वंचित राहतात. अन्नसुरक्षा केवळ आर्थिक गरिबीशीच संबंधित नाही तर निवाऱ्याचा प्रश्न, सेवांची पोहोच यावरही अवलंबून असते.

### ■ अन्नसुरक्षा लाभांना लक्षाधारित करणे थांबवा. रेशन, अंगणवाडी आणि इतर लाभांचे सार्वत्रिकीकरण करा...

**लाभार्थींच्या यादीत सर्वाधिक हलाखीच्या गटांचा समावेश होईल याची हमी द्या. याकरिता खालील यादीनुसार एकच 'समावेशाचा निकष' आधारभूत ठरवावा, तसेच कोणताही एक 'वगळण्याचा निकष' असे निश्चित करा.**

**समावेशाचा एक निकष-**

- भूमिहीन मजूर, असंघटित क्षेत्रातील कामगार, बांधकाम मजूर, ऊसतोडणी कामगार. वीटभट्टी कामगार, कोळसा कामगार, स्थलांतरित कामगार, हंगामी स्थलांतरित समाज इत्यादी.
- कातकरी, माडिया गोंड आणि कोलम सारख्या अतिमागास जमातीतील कुटुंब.
- ग्रामीण भागात कायमस्वरूपी रोजगार नसलेले आदिवासी.
- अल्पभूधारक आणि लहान शेतकरी.
- ज्या कुटुंबांकडे एक एकरापेक्षा कमी जमीन आहे आणि ज्यांचा उदरनिर्वाह प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून आहे.
- ज्या कुटुंबात कुटुंब प्रमुखाला गंभीर आजार झालेला आहे.
- ज्या विस्थापित कुटुंबांचे संपूर्ण पुनर्वसन झालेले नाही.
- फुटपाथवर, दलदलीच्या जमिनीवर राहणारे बेघर लोक.
- निराधार महिला, वेश्याव्यवसाय करावा लागणाऱ्या महिला, कुटुंबप्रमुख महिला असलेली कुटुंब.
- तृतीयपंथी समाज.
- आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे कुटुंब

**वगळण्याचा एक निकष-**

- कायमस्वरूपी सरकारी कर्मचारी, श्रेणी १, २ आणि ३ मधील.
- चार चाकी गाड्यावाले.
- शेती करता ट्रक्टर किंवा चारचाकी यंत्रांची मालकी असलेले.

- रु. ५०,००० हजार किंवा त्याहून अधिक रकमेचे किसान कार्ड बाळगणारे.
- सरकारी नोंदणी परवाना असलेली व्यापारी कुटुंबे.
- ५ एकरपेक्षा जास्त बागायती/सिंचित जमीनधारक

## ■ खाजगीकरण थांबवा, सध्याची रेशन व्यवस्था आणि अन्य व्यवस्था मजबूत करा...

• रोख रकमेने अन्नाची जागा घेणे शक्यच नाही. त्यामुळे गरीब लोक चंचल बाजाराच्या भरवशावर लोटले जातील. कंत्राटदारांकडे सेवा सोपवण्यामुळे प्रश्नांची जटीलता वाढली आहे. राज्याची जमीन आणि नैसर्गिक संसांधनांवरील नियंत्रणाबद्दलची धोरणे अन्न उत्पादनात वाढ करणारी, त्याकरिता आधार देणारी असणे महत्त्वाचे आहे, व्यापारीकरणाकरिता मदतीची नकोत.

- रेशन आणि अन्य अन्न विषयक उपक्रमांत रोख भरपाई नकोच.
- माध्यान्ह भोजन, पाकीटबंद घरी नेण्याचा शिधा, अंगणवाडी आणि रेशन याचे ठेकेदारीकरण आणि खाजगीकरण थांबवा.
- केवळ बचत गटांनाच जोडून घेण्याच्या धोरणाचे काटेकोर पालन करा.
- धान्याची नासडी होऊ नये म्हणून पुरेशी साठवण व्यवस्था निर्माण करा.
- विशेषतः आदिवासी पाडे आणि कुपोषण ग्रस्त तालुक्यांमधील (ब्लॉक्समधील) सर्व अंगणवाड्याच्या रिक्त जागांवर भरती करा.
- रेशन यंत्रणेद्वारा अंगणवाड्यांना नियमित आणि रास्त प्रमाणात स्वस्त धान्य, डाळी आणि तेल यांचा पुरवठा करा.
- अन्न पुरविणाऱ्या बचत गटांना वेळेवर पैसे द्या.
- 'जननी सुरक्षा योजने'सारख्या सर्व मातृत्व अनुदान योजनांचे लाभ वेळेवर द्या.
- किरकोळ बाजारपेठेत परदेशी कंपन्यांची घुसखोरी थांबवा.

## ■ पोषक दर्जेदार अन्न आणि लाभाची हमी द्या...

• आय.सी.एम्.आर्.ने दिलेल्या निकषांनुसार प्रतीव्यक्ती प्रतीमहा १४ किलो धान्य, ८०० ग्रॅम तेल आणि १.५ किलो डाळ योग्य पोषण मिळण्याकरिता आवश्यक असे म्हटले गेले आहे. म्हणजेच पाच व्यक्तींच्या प्रत्येक कुटुंबास दरमहा ५० किलो धान्य, २.८ किलो तेल आणि ५.२५ किलो डाळ अशी गरज आहे. (कुटुंबात २ प्रौढ व तीन लहान मुले असे गणित केलेले आहे). मात्र अन्नसुरक्षा कायद्यात केवळ दरडोई दरमहा केवळ ५ किलो धान्य पुरवण्यात येणार आहे, म्हणजेच हा कायदा फक्त न्यूनतम देणार. आम्ही अशी मागणी करतो की, महाराष्ट्र सरकारने अन्य राज्यांप्रमाणे स्वतःच्या निधीची भर घालून रेशनवर पुरविण्यात येणाऱ्या वस्तुंमध्ये अन्य आवश्यक पोषक घटकांची भर घालावी. तसेच इंधनाशिवाय अन्न शिजविणे शक्य नसल्यामुळे ग्रामीण व शहरी भागात पुरेसे रॉकेल (केरोसिन) व गॅस पुरवठा करण्याचीही व्यवस्था करण्यात यावी.



• रेशनमधून प्रत्येक कुटुंबाला ५० किलो धान्य, २.८ किलो खाद्य तेल, ५ किलो डाळ आणि २ किलो साखर नियमित पुरविण्यात यावे.

- रेशन व्यवस्थेतून १४ आवश्यक वस्तुंचा (उदा.मीठ...) पुरवठा करण्यात यावा.
- रेशनवर ज्वारी, बाजरी, नाचणी इत्यादी स्थानिकांनी उत्पादन केलेल्या भरड धान्यांचा समावेश करण्यात यावा.
- रेशन करिताचे धान्य विकेंद्रीत पद्धतीने खरेदी करण्यात यावे.
- प्रत्येक रेशन कार्ड धारकाला दरवर्षी १२ गॅस सिलेंडर अनुदानित दराने मिळण्यास पात्र करावे.
- अंगणवाडीतून घरी देण्यात येणारा शिधा स्थनिक रुची व आवड ध्यानात घेऊन विकेंद्रीत पद्धतीने तयार करण्यात यावा.
- जनुकीय हस्तक्षेपाने अन्नपदार्थ तयार करण्यास प्रतिबंध करावा.

## ■ अन्न सुरक्षेच्या बजेटमध्ये भरीव वाढ करावी...

• महाराष्ट्रातील एकंदर११ १.२५ करोड लोकसंख्येपैकी ७.१७ करोड असा आकडा केंद्र सरकारने अन्न सुरक्षेचे लाभार्थी म्हणून नमूद केलेला आहे. पण जवळजवळ सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने, जास्त लोकांपर्यंत आणि अधिक गोष्टींचा रेशनवर समावेश करून लाभ पोहचविण्यासाठी बजेट भरीव वाढविणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने या कायद्याचा विस्तार करून ८.७७ करोड लोकांचा समावेश करण्याचे निश्चित केले आहे, मात्र या जास्तीच्या १.६ करोड लोकांना जुन्याच दराने आणि प्रमाणात अन्न पुरविण्यात येईल. हा निर्णय भेदभाव करणारा आहे. यानंतरही लोकसंख्येतील मोठा गट वंचितच राहील. सर्व लाभार्थ्यांना पोषक आणि समतोल आहार मिळावा बजटमध्ये भरीव वाढ आवश्यक आहे.

• महाराष्ट्राच्या तुलनेने बरीच कमी लोकसंख्या असलेली राज्ये उदा. छत्तीसगढ (२००० करोड), तमिळनाडू (४९०० करोड), ओरिसा (१३१२ करोड) कितीतरी जास्त खर्च करतात व सबसिडीसाठी भक्कम तरतूद करतात. महाराष्ट्राच्या बजेटमध्ये सन् २०१३-२०१४ सालात रेशनसाठी सबसिडी केवळ रु. ३४८ करोड अशी किरकोळ तरतूद करण्यात आली आहे.

| राज्याचे नाव | रेशनवरील खर्च (कोटीमध्ये) | लोकसंख्या | दरडोई दरवर्षी रेशनवरील खर्च |
|---|---|---|---|
| छत्तीसगढ | २००० | २५,५४०,१९६ | रु. ७८६ |
| तमिळनाडू | ४९०० | ७२,१३८,९५८ | रु. ६७९ |
| ओरिसा | १३१२ | ५१,९४७,३५८ | रु. ३१३ |
| महाराष्ट्र | ३४८ | ११२,३७२,९७२ | रु. ३१ |

• इतर राज्यांमध्ये दरडोई राज्य सरकारचा अन्न सुरक्षेवरचा खर्च बघून, आपल्या लक्षात येतं की महाराष्ट्रात किती तरी पटीने राज्य सरकारला आपल्या अन्न सुरक्षेचा बजेट वाढवायला लागेल.

• म्हणून आम्ही मागणी करतो की महाराष्ट्र सरकारने सर्वांसाठी पोषक अन्न (आहार) पुरवण्याची हमी घेण्याकरिता बजेटमध्ये भरघोस भर घालावी.

## ■ शेती सुधार आणि संरक्षण याच्याशी अन्नसुरक्षेची सांगड घाला...

• शेतकऱ्यांचे जमिनीवरील हक्क अबाधित ठेवणे आणि त्यांचे संरक्षण करणे तसेच शेती आणि त्या संदर्भातील अन्य गोष्टींमध्ये गुंतवणुकीची हमी घेणे याशिवाय आपण अन्नसुरक्षा मिळवू शकत नाही. कोणत्याही विकसनशील अथवा विकसित अर्थव्यवस्थेत अन्नसुरक्षा आणि सार्वभौमत्व याच्या खात्रीसाठी शेतीचे संरक्षण अत्यावश्यक असते.

## ■ आम्ही मागणी करतो की–

• अन्नधान्याकरिता किमान आधारभूत किंमत मिळावी. (उत्पादन खर्च + त्या खर्चाच्या ५०% रक्कम इतकी असावी)

• अन्नधान्य पिकविण्यास प्रोत्साहन म्हणून विशेष लाभ देण्यात यावेत.

• स्थानिकांकडून खरेदी आणि स्थानिक वितरण पद्धती वापरावी. (यामुळे डिझेल व वाहतूक खर्चात बचत होईल, तसेच गळतीला आळा घालणे शक्य होईल.)

• शेत जमिनीचे बिगर शेती उपयोगासाठी हस्तांतरण थांबवावे.

• शेतीसाठी महत्त्वाची संसाधने जसे जमीन, पाणी आणि बी-बियाणे (बीज) या सारख्या आवश्यक गोष्टींचे (बाजारी) वस्तुकरण करणे आणि मोकाट व्यापारीकरण करणे थांबवावे.

(या शिफारशी स्वामीनाथन आयोगाने केल्या आहेत.)

## ■ व्यवस्थापनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणा...

• पारदर्शकता टिकविण्याकरिता अत्यंत आवश्यकता आहे ती स्थानिक आणि राज्य दोन्ही पातळ्यांवर नियमित देखरेख आणि तक्रार निवारणासाठी योग्य पद्धती आणि रचना कार्यरत करण्याची. माहिती केवळ इंटरनेट वापरणाऱ्यांनाच नव्हे तर सर्वांना मिळावी याची व्यवस्था करण्यात यावी. गावांत आणि शहरी वस्ती पातळीवर 'सोशल ऑडिट' (सामाजिक लेखाजोखा) किंवा लोकाधारित देखरेखीची योग्य व्यवस्था केल्याशिवाय हक्काच्या पूर्ततेची हमी देता येत नाही. एका सक्षम त्रयस्थ पदाधिकाऱ्यांच्या (उदा. निवृत्त न्यायाधीश) अध्यक्षतेखाली तक्रार निवारण यंत्रणा व त्यांना नुकसानभरपाई देण्याचे तसेच दंड करण्याचे अधिकार असणे आवश्यक आहे.



गरिबांचा विचार करणारी (गरिबांसाठीची), भेदाभेद न करणारी, काहींना न वगळणारे तंत्रज्ञान रेशनचे व्यवस्थापन आणि देखरेख करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकेल म्हणून त्याचा कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपयोग करण्यात यावा. स्थानिक निवडून आलेल्या संस्थांचा (गावसभा, ग्रामपंचायत) निर्णयप्रक्रियेत अधिक सहभाग हवा. सर्व स्तरांवर निर्णयप्रक्रिया अधिक विकेंद्रीत करण्यात यावी.

• लाभार्थी नोंदविणे आणि वितरण याबद्दलचे सर्व निर्णय ग्रामसभेने आणि वॉर्डसभेने घ्यावेत.

• रेशन देखरेख समित्या पुन्हा सक्रिय करा. त्यांचे अन्नसंबंधित उपक्रमांची व योजनांची देखरेख करणारी लोकाधारित देखरेख समिती असे रूपांतरण करा. याकरिता ग्राम आरोग्य, स्वच्छता आणि पोषण समितीला योग्य प्रशिक्षण द्या.

• अन्नपुरवठा करणाऱ्या वाहनांचा पाठपुरावा (पाठलाग) करण्याची योग्य व्यवस्था करा. उदा. GPS वापरणे.

• तालुका (ब्लॉक), जिल्हा आणि राज्य पातळीवर सक्षम त्रयस्थ देखरेख आणि तक्रार निवारण व्यवस्थेची हमी घ्या.

• सर्व स्तरांवर ठराविक कालावधीनंतर अन्नासंदर्भातील सर्व उपक्रमांचे आणि योजनांचे सामाजिक अंकेक्षण (सोशल ऑडिट) आणि जनसुनवाई यांचे आयोजन करा.

• धान्य खरेदीपासून ते घरगुती वितरणापर्यंत संपूर्ण रेशन व्यवस्थेचे संगणकीकरण अपरिहार्य केले जाईल याची हमी घ्या.

• मोफत हेल्प लाईन योग्य पद्धतीने कार्यरत राहील याची हमी घ्या.

• दक्षता समित्या नेमणुकांमधील राजकीय हस्तक्षेप थांबवा.

• अन्न सुरक्षा कायद्यान्वये नेमावे लागणारे जिल्हा तक्रार निवारण अधिकारी स्वतंत्र कार्यभार देऊन नेमण्यात यावेत.

# २ पाणी : पिण्याचे, घरगुती वापराचे आणि उपजीविकेचे !

भारताच्या राज्यघटनेमध्ये अतिशय स्पष्टपणे असे म्हटले आहे की देशातील जनतेला शुद्ध पाणी पुरवण्याची जबाबदारी सरकारची आहे. मात्र सरकार गेल्या ३० वर्षांपासून सातत्याने पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी पैसे नसल्याची तक्रार करते आहे. भारताने १९९१ साली जागतिकीकरण आणि खाजगीकरण स्वीकारल्यानंतर तर सरकारने पाणीपुरवठा योजना बांधणे आणि चालवणे ही शासनाची जबाबदारी नाही असे जाहीरच करून टाकले. याउलट लोकांनी पाणीपुरवठा योजना चालवणे आणि शक्य झाल्यास बांधण्यासाठीचाही आर्थिक भार उचलावा आणि खाजगी ठेकेदार किंवा कंपन्यांद्वारे हे काम पालिकांनी आणि ग्रामपंचायतींनी करावे असे धोरण स्वीकारले. फारतर ग्रामपंचायतींचे सक्षमीकरण करणे आणि खाजगी क्षेत्रासही पाठबळ पुरवणे हे काम सरकार करेल अशी भूमिका सरकारने घेतली. या धोरणाची पाठराखण करण्यासाठी जागतिक बँक आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांच्या अहवालामधील विश्लेषण जसेच्या तसे स्वीकारून सरकार कसे अकार्यक्षम आहे हे सरकारनेच मान्य केले आणि कार्यक्षम व दर्जेदार सेवा केवळ खाजगी कंपन्याच देऊ शकतात हेही बिनदिक्कतपणे स्वीकारले.

या धोरणाअंतर्गत शहरी भागाचा पाणीपुरवठा खाजगी कंपन्यांनी करावा यासाठी सरकार 'सार्वजनिक खाजगी सहभाग' या गोंडस नावाखाली मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करीत आहे. खाजगी कंपन्यांना जर पाणीपुरवठा करायचा असेल तर त्या देशातील गरीब जनतेस शुद्ध पाणी मिळावे अशा कल्याणकारी हेतूने येतील काय या प्रश्नाचे उत्तर सरकार देण्यास तयार नाही. मात्र, खाजगी कंपन्यांना मोजून पाणीपुरवठा करता यावा यासाठी जलमापके (मीटर) बसवण्याचे आणि वापरानुसार पाण्याचा दर वाढवत नेण्यास मंजुरी दिली. हिशोब सरळ आहे, जो जास्त पैसे देईल त्याला जास्त पाणी या सूत्रानुसार खाजगी कंपन्याना सरकारने एका प्रकारे बाटलीबंद पाण्याप्रमाणे पाईपलाईनमधूनही पाणी विकण्यास परवानगी दिली असे म्हणता येईल. इतकेच नाही तर मोबाईलप्रमाणे प्री-पेड मीटर आणण्याचे धोरणही राबवण्याचा एक प्रयत्न मुंबईमध्ये केला गेला. (जो जागरूक सामाजिक संस्था-संघटनानी उलथून लावला.) आणि हे करणे सुकर व्हावे म्हणून पाश्चात्य देशातील शहरांप्रमाणे २४ तास



पाणीपुरवठ्याच्या योजना बांधण्याचे सरकारने प्रयत्न सुरू केले आहेत.

खाजगीकरणाच्या भारतातील अनेक फसलेल्या प्रयोगातून असे दिसते की खाजगी ठेकेदारही शहराला स्थायी तत्त्वावर शुद्ध, दर्जेदार आणि खात्रीलायक पाणीपुरवठा देऊ शकत नाही. यासाठी तमिळनाडूमधील तीरुप्पूर सारख्या औद्योगिक शहरापासून महाराष्ट्रातील चंद्रपूरपर्यंत अनेक उदाहरणे देता येतील. नागपूर शहरात खाजगी सहभागातून सुरू असलेल्या २४ तास पाणीपुरवठ्याच्या प्रयोगातूनही श्रीमंतांना जास्त पाणी आणि गरिबांना पाण्याचा ठराविक कोटा असेच चित्र दिसते. मात्र, कऱ्हाडलगतच्या मलकापूर या छोट्या शहरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासारख्या शासकीय संस्थेने २४ तास पाणीपुरवठ्याचा प्रयोग यशस्वी केला असल्याचे दिसते. अर्थात पाण्याचा दर गरिबांना परवडेल असे तर कुठल्याच प्रयोगात दिसत नाहीये, म्हणून पिण्याचे पाणी नळातून आणि इतर वापराचे पाणी विहिरी/बोअरवेलमधून असा पर्याय लोकांना स्वीकारावा लागत आहे. ज्यांच्याकडे असा पर्याय आहे त्यांना पाईपच्या पाण्याचा हक्क नाही आणि ज्यांना विहिरींचा पर्याय नाही त्यांचे मात्र दुहेरी हाल असे चित्र दिसते. भारतात ही गंभीर परिस्थिती असली आणि 'पाणीपुरवठा खाजगी कंपनीऐवजी सरकारनेच करावा' अशा मागण्या युरोपीय देशांसह जगातील विविध देशांमधून उभ्या राहत असल्या तरी आपले सरकार मात्र खाजगीकरण पुढे रेटते आहे.

ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याची जबाबदारी झटकण्यासाठी खाजगीकरणाची नीती ग्रामीण भागात राबवणे शक्य नाही, कारण ग्रामीण गरिबांकडून कंपनी नफा कमवू शकणार नाही याची शासनाला कल्पना होतीच. म्हणून शासनाने ग्रामपंचायतींनाच आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले. तसेच 'मागणी आधारित नीती' जाहीर करून ज्या ग्रामपंचायती योजनेच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च उचलण्यास तयार होऊन मागणी करतील अशा ग्रामपंचायतीमध्ये योजनेचे पैसे मिळवण्यासाठी स्पर्धा लावली गेली. अशा स्पर्धेतून निवडलेल्या ग्रामपंचायतींना नळपाणीपुरवठा योजनांसाठी त्यांच्या वार्षिक बजेटच्या तब्बल १० ते १५ पट रक्कम (८ ते २० लाख) दिली गेली. यामुळे अनेक गावांना योजना परवडली नाहीच. ज्यांना परवडली तिथेही पाण्याचे स्रोत आटले आणि अनेक योजना बंद पडल्या. अर्थात बंद पडलेल्या गावांमध्ये सरकार पुन्हा किमान १५ वर्षे निधी देण्यास तयार नाही, कारण पूर्वअटीनुसार योजनेच्या देखभालदुरुस्तीची जबाबदारी ग्रामपंचायतीची / ग्रामसभेची आहे. महत्त्वाचे म्हणजे अशाच स्वरूपाच्या योजना देशभर राबवण्यासाठी जवळपास सर्वच राज्यांनी जागतिक बँक, आशियायी विकास बँक, जपानी बँक अशा बँकांकडून कर्जे घेण्याचा सपाटा सुरू केलेला दिसतो. या

कर्जाच्या रकमेतून मोठमोठ्या पैशाच्या योजना आणणे आणि गावामध्ये राबवणे यामुळे ग्रामीण भागातही योजना बांधण्यासाठी कंत्राटदार आणि ग्रामपंचायतींच्या 'सक्षमीकरणा'साठी बिगरशासकीय संस्था यांचे जाळे फोफावलेले दिसते. यामुळे निकृष्ट दर्जाचे बांधकाम होऊन योजना चालवण्याचा खर्च दुप्पट होतो आणि काही निवडक अपवाद वगळता चांगल्या योजनाही बंद पडतात असा अनुभव आहे.

ग्रामीण भागातील सार्वजनिक स्वच्छतेबाबत शासनाची धोरणे अपुरीच असल्याचे दिसते. गावोगाव अनेक वर्षे (निकृष्ट दर्जाची) शौचालये बांधण्याचा कार्यक्रम राबवूनही प्रश्न सुटत नसल्याचे लक्षात आल्यानंतर लोकांच्या वागणुकीत बदल घडवून आणण्याचा प्रबोधनाचा मार्ग शासनाने स्वीकारला. उदा. संपूर्ण स्वच्छता अभियानाची योजना. या कार्यक्रमातील सर्वांगीण उद्दिष्ट योग्य असले तरी अशा एककल्ली कार्यक्रमावर अतोनात पैसे घालवूनही अतिशय मर्यादित यश मिळत असल्याचे दिसते. मुळात गावामध्ये पुरेसा पाण्याचा साठा असेल आणि दारापर्यंत पाणी आल्यासच शौचालये बांधणे वापरणे यासाठीचा वागणुकीतील बदल होऊ शकतो हे सत्य नजरेआड केले गेले. म्हणूनच अपवाद वगळता संपूर्ण स्वच्छतेसाठी पुरस्कार मिळालेल्या गावेही अवघ्या वर्षभरातच पूर्वस्थितीत आली.

आजच्या घडीला ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न हा केवळ पिण्याच्या पाण्याच्या सुट्या सुट्या स्रोतांशी निगडित राहिलेला नाही. वेगाने होणारे औद्योगीकरण आणि नागरीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातील शेतीचे पाणी उद्योग आणि शहरांकडे वळवले जाते आहे. शेतीसाठी बांधलेली धरणांचे पाणी उद्योगांना दिल्यामुळे श्रीमंत आणि उच्च मध्यमवर्गीय शेतकरी शेतीसाठी लागणारे पाणी जमिनीखालूनच मिळवतात आणि गरीब शेतकऱ्यांना पावसाच्या पाण्यावरच अवलंबून रहावे लागते. यामुळे एका बाजूने अनेक छोट्या शेतकऱ्यांच्या उपजीविका नष्ट होत असून दुसऱ्या बाजूने शेतीसाठी केल्या जाणाऱ्या भूजलाच्या उपशाचा परिणाम पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवरही होतो आहे. परिणामी ग्रामीण पेयजलाचे स्रोत वेगाने आटत चालले असून टँकरवरील अवलंबित्व वेगाने वाढते असून टँकर भरण्यासाठीही गावांपासून / तालुक्याच्या ठिकाणापासून ४०-५० किमी दूरपर्यंत पाण्याचे स्रोत उपलब्ध नसल्याचे चित्र आहे. अशा भूजलाचे अतिशोषण झालेल्या भागामध्ये खोलवर विंधनविहिरी खणण्यावर आणलेली बंदी योग्य असली तरीही तितक्यात तातडीने त्यावर पर्याय शोधणे व त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. दुष्काळप्रवण भागामध्ये महिलांना करावी लागणारी पायपीट हा नित्याचाच प्रश्न बनला असून त्याकडे पाहण्याची संवेदनशीलताही हरपत चालली आहे. भारतातील ८५ टक्के सिंचन आज भूजलावर अवलंबून असून महत्त्वाचे म्हणजे ९५



टक्के ग्रामीण पेयजलही भूजलावरच अवलंबून आहे. म्हणूनच 'धरणातील पाणी शेतीसाठी की उद्योगांसाठी' या प्रश्नाइतकेच महत्त्व 'भूजल पिण्यासाठी की शेतीसाठी' या प्रश्नालाही प्राप्त झाले असून आणि महत्त्वाचे म्हणजे हे प्रश्न एकमेकांशी जोडलेले आहेत आणि ते सोडवण्यासाठी एकात्मिक दृष्टिकोनातून ठोस उपाय करण्याची आवश्यकता आहे.

याप्रमाणेच, मोठ्या धरणांनाच पाण्याचे सुरक्षित आणि खात्रीलायक साठे मानले गेल्याने शहरांच्या पाणीपुरवठ्यासाठी वेगाने धरणे बांधण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. धरणांमुळे होणारी नैसर्गिक संसाधनांची अपरिमित हानी, होणारे विस्थापन आणि नष्ट होणाऱ्या उपजीविका आणि संस्कृती याकडे पद्धतशीरपणे सरकारी धोरणे डोळेझाक तर करतातच, मात्र ग्रामीण भागात पडणाऱ्या ग्रामीण जनतेच्या पाण्याचा हक्कही त्यांच्याकडून हिरावून घेतला जातो आहे. वस्तुतः केवळ शहरी भागास पुरवल्या जाणाऱ्या धरणातील पाण्यापैकी केवळ १० ते १५ टक्के पाणी हे पिण्यासाठी आणि स्वयंपाक करण्यासाठी वापरले जात असून उर्वरित पाणी हे शौचालयातील फ्लश, उद्याने आणि गाड्या साफ करण्यासारख्या उपयोगांसाठी वापरले जाते. उलटपक्षी यापैकी बरेचसे पाणी सांडपाण्याचा पुनर्वापर करून तसेच पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण करून वापरता येईल आणि धोरणाने याची दखल घेणे आवश्यक आहे. प्रगत देशातील अनेक शहरे याच पर्यायांचा अवलंब करून त्यांचे ग्रामीण भागातील पाण्याचे अवलंबित्व कमी करत असून भारतामध्ये मात्र प्रत्यके शहराचे स्वतःचे धरण असावे अशा घोषणा राजकीय व्यासपीठांवर कायमच केल्या जात असल्याचे दिसते. म्हणूनच धोरणांच्या पातळीवर याची दाखल घेऊन ताबडतोबीने शहरांसाठी केली जाणारी ग्रामीण भागातील संसाधनांची आणि पाण्याची लूट थांबवणे आवश्यक आहे.

**या पार्श्वभूमीवर शहरी आणि ग्रामीण भागातील जनतेला पुरेसे, शुद्ध, घरगुती वापराच्या पाणी खात्रीलायकरित्या आणि सातत्यपूर्ण स्तरावर मिळावे म्हणून आम्ही खालील मागण्या करीत आहोत-**

**(अ)** वस्तुतः ग्रामीण आणि शहरी पाणीपुरवठ्याचे प्रश्न सोडवायचे असल्यास **सरकारने पिण्याच्या पाण्याची संपूर्ण (आर्थिक आणि प्रत्यक्ष पुरवठा करण्याची) जबाबदारी स्वीकारावी.** ग्रामपंचायतींचे आणि पालिकांचे सक्षमीकरण करणे ही बाब महत्त्वाची असली तरीही **जोवर स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक बाजू भक्कम होत नाही तोवर पिण्याच्या पाण्यासाठी पुरेसा निधी स्थानिक स्वराज्य संस्थाना उपलब्ध करून देण्यात यावा.** पालिकांना ७४ व्या घटनादुरुस्तीने पिण्याच्या पाण्यासह १८ विविध सामाजिक सेवा देण्याची जबाबदारी दिली खरी मात्र यासाठी

संकलित केला जाणारा निधी केंद्र आणि राज्य शासनाकडेच आहे. या निधीचे विकेंद्रीकरण सामाजिक सेवांवरील खर्च वाढवून केल्याशिवाय खऱ्या अर्थाने सेवा पुरवण्याची क्षमता स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये येणार नाही.

(आ) २४ तास पाणीपुरवठ्याचे मॉडेल तत्परतेने बंद करावे आणि 'जो जास्त पैसे मोजेल त्याला जास्त पाणी' हे धोरण थांबवावे. पूर्वीप्रमाणे सकाळी दोन तास आणि संध्याकाळी दोन तास या पद्धतीने पाणी दिले जावे किंवा पाणी मोजून देण्याचे धोरण अवलंबल्यास सगळ्यांना सारखेच पाणी दिले जावे.

(इ) शहरी भागात सुरू असलेले खाजगीकरणाचे प्रयत्न ताबडतोब थांबवावेत. तसेच सार्वजनिक संस्थांकडे पुरेसे ज्ञान आणि कौशल्ये असल्याने पाणीपुरवठा सुधारण्यासाठी खाजगी सल्लागार कंपन्यांकडून विकत घेतला जाणारा सल्लाही ताबडतोब थांबवाबा. यातून सरकारी पैशांचे नुकसान होत असून, सरकारने खाजगी सेवा पुरवठादारांना (कंपन्या आणि ठेकेदार) आकर्षित करण्यासाठी सुरू केलेली निधीसहाय्याची योजना (व्हाएबिलिटी गॅप फंडिंग) बंद करण्यात यावी.

(ई) शहरी भागांमध्ये पाणीपुरवठ्याचे पर्याय विकसित करण्यासाठी सांडपाण्याचा पुनर्वापर, पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण यांसारख्या उपायांवर भर देण्यासाठी शासनाने त्यासाठी पुरेसे निधीसाह्य देणे आवश्यक आहे. याप्रमाणेच, समुद्र किनाऱ्यालगतच्या शहरांसाठी सागरी पाण्याच्या शुद्धीकरणाचा पर्यायही व्यवहार्यतेचे निकष लक्षात घेऊन अंमलात आणला जावा.

(उ) ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याचे स्रोत सुरक्षित ठेवायचे असल्यास शेतीला पुरेसे पाणी मिळायला हवे. यासाठी ग्रामीण भागातून शहरी आणि औद्योगिक भागाकडे पाणी वळवण्याचे/पळवण्याचे धोरण ताबडतोब थांबवावे आणि आजवर वळवलेले पाणी पुन्हा शेतीसाठी उपलब्ध करून दिले जावे.

(ऊ) 'पिण्याचे पाणी वि. शेती', तसेच 'शेती वि. उद्योग' असे वाद उभे न करता पिण्याच्या पाण्याला धोरणाने दिलेले प्रथम प्राधान्य प्रत्यक्षात आणण्यासाठी लोकसहभागी देखरेख व्यवस्था अंमलात आणावी. अशा लोकाधारित देखरेखीतून पुढे आलेले प्रश्न आणि सुझाव अंमलात आणण्यासाठी शासनव्यवस्थेला जाबदायी बनवावे.

(ए) ग्रामीण पेयजल योजनांसाठी निधी मिळवण्याकरिता करसंकलन, पाण्याचे संवर्धन, ग्रामसभेचा सहभाग इ. निकषांच्या आधारावर ग्रामपंचायतींना एकमेकांमध्ये स्पर्धा लावणे चुकीचे आहे, जरी यातून काही ग्रामपंचायतीचा कारभार सुधारत असला तरीही. कारण यामुळे काही पंचायती स्पर्धेतून बाहेर फेकल्या जातात आणि त्यांना



इतर योजनांची वाट पाहावी लागते. असे स्पर्धा लावणारे आणि बक्षिसे वाटावयाचे धोरण बदलून शुद्ध पाणीपुरवठा देण्याची जबाबदारी शासनाने घ्यावी.

(ऐ) ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी म. फुलेंनी सुचवल्याप्रमाणे 'माथा ते पायथा' या तत्त्वावर पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्यक्रम राबवणे आवश्यक असून पाणी जिरविणे, माती सुरक्षा, वृक्ष आच्छादन वाढविणे हे कार्यक्रम शास्त्रीय पद्धतीने घेणे आवश्यक आहे. यामध्ये केवळ आजवर केलेल्या प्रयत्नांचे अपयश लक्षात घेणेही आवश्यक आहे. त्याचप्रमाणे स्थानिक ठिकाणी उपलब्ध असलेल्या भूजलाच्या उपलब्धतेचा शास्त्रीय अभ्यास करून पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीकपद्धती ठरवणे आणि त्याची सुव्यवस्थित अंमलबजावणी करण्याची व्यवस्था लावणेही आवश्यक आहे.

(ओ) ज्या गावांमध्ये पिण्याचे पाणी शहर आणि उद्योगांमुळे प्रदूषित होत आहे अशा गावांसाठी तातडीने प्रदूषण रोखण्यासाठी यंत्रणा राबवावी. मिळणारे पाणी पुरेसे शुद्ध असल्याची खातरजमा करण्यासाठी लोकाधारित देखरेख प्रक्रिया, प्रदूषण नियंत्रण महामंडळ आणि प्राथमिक आरोग्य केंद्राची यंत्रणा यांनी प्रभावी काम करावे व त्यासाठी आवश्यक पाठबळ त्यांना दिले जावे.

(औ) ग्रामीण भागातील ४० लिटर प्रतिव्यक्ती प्रतिदिन हा पाणीपुरवठ्याचा निकष अपुरा असून जनावरांसाठीचे पाणी आणि इतर गरजा भागल्या जात नाहीत. यामुळे हा निकष वाढवून जनावरांच्या संख्येनुसार ग्रामीण भागात पाणी उपलब्ध करून द्यावे.

# ३ दर्जेदार, आरोग्य-सेवा सर्वांना मिळालीच पाहिजे! ती मोफत, संवेदनशील, उत्तरदायी असलीच पाहिजे !!

स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे उलटून गेली तरी भारतातील बहुतांश जनतेला चांगली आरोग्यसेवा मिळत नाही. सरकारी सेवा फारच तुटपुंजी, असंवेदनशील व अनेकदा सुमार दर्जाची झाली आहे तर बहुतांश खाजगी सेवा अकारण महागडी व म्हणून सामान्यांना न परवडणारी आहे. एवढेच नव्हे तर खाजगी सेवेवर कसलेच नियंत्रण नसल्याने ती बेभरवशाच्या दर्जाची, अनेकदा रुग्णांची पिळवणूक, फसवणूक करणारी बनली आहे. पण ही परिस्थिती बदलून 'सर्वासाठी दर्जेदार, मोफत आरोग्य सेवा' हे ध्येय भारतात येत्या १० वर्षात गाठणे शक्य आहे. अमेरिकेचा अपवाद सोडला तर बाकी विकसित भांडवली देशांनी तसेच थायलंड, मलेशिया, श्रीलंका, ब्राझील, व्हेनेझुएला अशा अनेक विकसनशील देशांनीही 'सर्वांसाठी आरोग्यसेवा' हे ध्येय गाठले आहे. भारतातही 'सर्वासाठी आरोग्यसेवा' हे ध्येय गाठणे आता शक्य आहे हे ठोसपणे 'जन आरोग्य अभियान'ने मांडून त्याबाबतच्या मागण्या सरकारकडे केल्या आहेत. पैकी 'जगण्याचा हक्क आंदोलन'चा एक भाग म्हणून खालील मागण्यांसाठी सर्वानी एकत्र लढा उभारला पाहिजे.

### १. आरोग्यसेवेसाठीच्या सरकारी निधीमध्ये ताबडतोबीने भरीव वाढ करा.

भारतात नागरिक आपल्या खिशातून वर्षाला दर डोई सरासरी सुमारे २,००० रु. खर्च करतात. राज्य सरकारे व केंद्र सरकार मिळून आरोग्यसेवेवर दर डोई वर्षाला त्याच्या एक-चतुर्थांश म्हणजे दर डोई सरासरी सुमारे फक्त ५०० रु. म्हणजे राष्ट्रीय उत्पादनाच्या फक्त सुमारे १% खर्च करतात. आरोग्यसेवेवरचा सरकारी खर्च जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारसीनुसार राष्ट्रीय उत्पादनाच्या ५% असायला हवा. सरकारचा आरोग्यसेवेवरचा खर्च आधीच तुटपुंजा होता. तो वाढायच्या ऐवजी १९९० नंतरच्या 'खाउजा धोरणामुळे' सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या १.३% वरून २००४ पर्यंत ०.९% पर्यंत घसरला. महाराष्ट्र सरकारचा आरोग्यसेवेवरचा खर्च तर १९९० ते २००४ या काळात राज्य उत्पादनाच्या १% वरून ०.५% पर्यंत घसरला! २००४ नंतरही त्यात वाढ नाही!! त्यामुळे महाराष्ट्रात आता ८६% बाह्यरुग्ण व ७२% आंतर-रुग्ण खाजगी क्षेत्राकडे जातात.

'इंडिया शायनिंग' हे उघडे-नागडे 'खाउजा' धोरण राबवणाऱ्या भाजपा-प्रणित आघाडीचा २००४ च्या निवडणुकीत पराभव झाला. त्यामुळे काँग्रेस-प्रणित आघाडीने काही बाबतीत थोडे वेगळे वळण घेऊन 'राष्ट्रीय ग्रामीण अभियान' मार्फत ग्रामीण



भागातील सार्वजनिक आरोग्यसेवांमध्ये काही सुधारणा केल्या. त्यासाठी आरोग्य-सेवेवरचा सरकारी खर्च वाढवून हे प्रमाण २०१२ पर्यंत १.४% पर्यंत वाढवले. खरं तर हे प्रमाण २००९ पर्यंत २ ते ३ टक्क्यांपर्यंत वाढवू असा त्यांचा वादा होता.

या 'खाउजा' धोरणामुळे सरकारी आरोग्यसेवा अधिकच तुटपुंजी, दुबळी झाली आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी १२ व्या पंचवार्षिक योजनेचा मसुदा आता म्हणतो की, 'सरकारी खर्चाचे प्रमाण २०१७ पर्यंत २.१%% केले जाईल व त्यासाठी या खर्चात दर वर्षी ३५%नी वाढ होईल.' पण पहिल्या दोन वर्षी केंद्रीय अंदाजपत्रकात अनुक्रमे फक्त १४ व ८% वाढ केली आहे !!

गेली काही वर्षे सरकारचे कर-उत्पन्न दर वर्षी १ लाख कोटी रु. ने वाढते आहे. पण ते आरोग्यसेवेसारख्या सेवेवर वाढवले जात नाहीय. उदा. सरकारी दवाखाने, इस्पितळे इथे जाणाऱ्या सर्व रुग्णांना 'तामिळनाडू मॅाडेल'प्रमाणे सर्व आवश्यक, जेनेरिक औषधे मोफत देण्यासाठी औषधांवरील सरकारी खर्च आजच्या दुप्पट म्हणजे १२००० कोटी रु. करावा लागेल. 'सरकारी केंद्रात जाणाऱ्या सर्व रुग्णांना सर्व आवश्यक औषधे मोफत मिळतील' असे पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी १५ ऑगस्ट, २०१२ च्या लाल-किल्ल्यावरून दिलेल्या भाषणात सांगितले. या योजनेसाठी आरोग्य-खात्याने २०१३-१४ च्या अंदाज-पत्रकात फक्त १३०० कोटी रु. मागितले होते. पण चिदंबरमनी तेवढेही दिले नाहीत !

**या पार्श्वभूमीवर आम्ही मागणी करतो की,**

- आरोग्यसेवेवरचा सरकारी खर्च ताबडतोब दुप्पट करा. नंतर दरवर्षी ५०% नी वाढवून ५ वर्षात राष्ट्रीय उत्पादनाच्या ३% व १० वर्षात ५% करा.
- सरकारी दवाखाने, इस्पितळे इथे जाणाऱ्या सर्व रुग्णांना 'तमिळनाडू मॅाडेल' प्रमाणे सर्व आवश्यक, जेनेरिक औषधे मोफत देण्यासाठी औषधांवरील सरकारी खर्च आजच्या दुप्पट म्हणजे १२००० कोटी रु. करा.
- आरोग्यावर सरकारचा वाढीव निधी प्राधान्याने सरकारी आरोग्यसेवेच्या बळकटीकरणासाठी खर्च करा. सार्वजनिक-खाजगी भागीदारी या नावाखाली तो खाजगी खिशात घालण्याचा कार्यक्रम बंद करा.

### २. कोणत्याही कार्डाची वा इतर अट न घालता सरकारी आरोग्यसेवा, सर्वांना मोफत द्या. कोणालाही वगळू नका.

सरकारी आरोग्यसेवा पूर्वी सर्वांना मोफत होती. पण 'खाउजा' धोरणामुळे फक्त पिवळे कार्ड असणाऱ्यांनाच ती मोफत मिळू लागली. 'राष्ट्रीय स्वास्थ्य बीमा योजना', 'राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना' या योजना सुद्धा 'गरीब /दुर्बल/ घटक असल्याचे कार्ड असणाऱ्यांनाच मिळतात. या धोरणामुळे घोळ होतात. एक तर फक्त

गरिबांसाठी असणाऱ्या सेवांचा दर्जा खराब असतो. ज्या सरकारी सेवेचा लाभ मध्यम व त्या वरील थरसुद्धा घेतात त्याच चांगल्या दर्जाच्या असतात. दुसरे म्हणजे अनेक गरिबाना ही कार्डे मिळत नाहीत. तात्पुरते स्थलांतर केलेले मजूर, रस्त्यावर राहणारे, अनाथ इ. घटक याना मोफत आरोग्यसेवेची सर्वात जास्त गरज असूनही नेमके त्यातील बहुतेकांना ही कार्डे मिळत नाहीत. तिसरे म्हणजे अशा कार्ड-धारकांनाही काही सेवा (उदा. सी.टी. स्कॅन,) मोफत मिळत नाहीत. त्यामुळे त्यांची फार परवड होते. पूर्वी सरकारी सेवेतील शुल्क नाममात्र असायचे. आता ते वाढवत नेले जात आहे. काही सरकारी इस्पितळातील दर महाराष्ट्र सरकारने २०११ मध्ये अडीचपट केले! ते गरिबांना परवडत नाहीत. गरिबीच्या रेषेच्या थोडेसे वर असणाऱ्यांनाही हे वाढीव शुल्क परवडत नाही. त्यांच्यापैकी लाखो जण दर वर्षी दारिद्र्यरेषेखाली ढकलले जातात. पण त्यांची नोंद होत नाही. हे शुल्क आकारल्यामुळे सरकारी केंद्रांच्या खर्चापैकी जेमतेम १०% खर्च भागतो. बाकी सरकारलाच करावाच लागतो. निरनिराळे अभ्यास दाखवतात की सरकारी केंद्रातील दर थोडे जरी वाढवले तरी त्याच्या किती तरी अधिक प्रमाणात गरीब लोक या सेवा घ्यायचे बंद करतात. मध्यम व श्रीमंत-वर्गाला कशाला फुकट सेवा द्यायच्या असे विचारले जाते. त्यांच्याकडून खर्च वसूल करायचा योग्य मार्ग म्हणजे विकसित राष्ट्रांप्रमाणे भारतातही त्यांच्याकडून उत्पन्नाच्या प्रमाणात अधिक प्रमाणात प्रत्यक्ष कर घेणे व चैनीच्या वस्तूंवरील अप्रत्यक्ष कर वाढवणे. **म्हणून आम्ही मागणी करतो की,** नियोजन मंडळाच्या उच्च-स्तरीय तज्ज्ञ समितीने केलेल्या शिफारसीनुसार सर्व सरकारी आरोग्य-केंद्रात शुल्क घेणे बंद करा.

## ३. सामाजिक सेवा पुरवणाऱ्या सार्वजनिक यंत्रणांचे खाजगीकरण, कंत्राटीकरण, खच्चीकरण, थांबवा. त्यांचे बळकटीकरण करून त्यांच्यात पुरेशी वाढ करा.

आधीच अपुऱ्या असलेल्या सार्वजनिक आरोग्यसेवांची १९९० नंतर सरकारने उपासमार करून तसेच प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष खाजगीकरण कंत्राटीकरण करून खच्चीकरण केले आहे. हे बंद करून पुरेसा निधी देणे, पुरेशी नोकर-भरती करणे, कंत्राटी-कामगारांना कायम करणे, नवीन नेमणुका व बढती याबाबत कर्नाटकप्रमाणे पारदर्शकता आणणे अशी पावले उचलून या ***सार्वजनिक आरोग्यसेवांचे बळकटीकरण*** करा. येत्या पाच वर्षात सार्वजनिक आरोग्यसेवेची यंत्रणा दुप्पट झाली पाहिजे. 'आर्थिक स्वावलंबन' या गोंडस नावाखाली ही आरोग्य-केंद्रे बाजारी तत्त्वानुसार चालवण्याकडचा प्रवास बंद करा.

आज ९०% डॉक्टर्स खाजगी आहेत. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्र वेगाने वाढवले तरी सर्व जनतेला आरोग्यसेवा पुरवण्यासाठी येती काही दशके काही बाबतीत काही



प्रमाणात खाजगी डॉक्टर्सचे सहकार्य घेणे आवश्यक आहे. मात्र ***सार्वजनिक आरोग्यसेवेची यंत्रणा हीच राष्ट्रीय आरोग्यसेवेचा कणा असेल, नेतृत्वात असेच धोरण घ्या.*** लसीकरण, साथींवर नियंत्रण, आपत्कालीन परिस्थितीत पडणारी जबाबदारी, गरिबांना आरोग्यसेवा मिळण्याचे हक्काचे ठिकाण, राष्ट्रीय आरोग्य-कार्यक्रम, वैद्यकीय महाविद्यालये अशा भूमिका बजावण्यासाठी सार्वजनिक आरोग्य-क्षेत्र प्रभुत्वस्थानी हवेच पण खाजगी आरोग्यसेवेपुढे दर्जेदार सेवेची परिमाणे घालून देण्याचे काम तसेच त्यांच्यावर सक्षमपणे नियंत्रण ठेवण्याचे काम करण्यासाठीही सार्वजनिक आरोग्य-क्षेत्र प्रभुत्वस्थानी असणे आवश्यक आहे.

जिथे सार्वजनिक आरोग्यसेवा बळकट करूनही त्या जिथे कमी पडतील तिथे नियोजन मंडळाच्या उच्च-स्तरीय तज्ज्ञ समितीने शिफारस केल्याप्रमाणे खाजगी डॉक्टर्सच्या सेवा सरकारने विकत घेऊन लोकांना मोफत उपलब्ध करून द्या. ***या खाजगी सेवा 'प्रमाणित दर्जाच्या सेवेसाठी प्रमाणित शुल्क' या तत्त्वावर विकत घ्यायला पाहिजेत*** व त्यांनी सार्वजनिक आरोग्य यंत्रणेशी संलग्न, सार्वजनिक आरोग्यसेवांच्या तत्त्वानुसार काम करायला पाहिजे. खाजगी डॉक्टरांशी होणारे सर्व व्यवहार, करार पारदर्शी, सामाजिक निकष पाळणारे असतील व लाभार्थी जनतेला थेट उत्तरदायी असतील हे धोरण घ्या.

## ४. सामाजिक सेवा लोकांप्रती उत्तरदायी करण्यासाठी 'लोकाधारित देखरख' या कार्यक्रमाचे सार्वत्रिकरण करा.

सार्वजनिक आरोग्यसेवांचा लाभ अधिकाधिक लोकांनी घ्यायचा असेल तर त्यात सुधारणा व्हायला हव्या. त्यातील एक महत्त्वाची सुधारणा म्हणजे ज्या लोकांसाठी या सेवा आहेत त्यांचा या सेवांवर देखरेख ठेवण्यात थेट सहभाग असला पाहिजे व लोकांप्रती ती संवेदनशील व थेटपणे उत्तरदायी असायला हवी. हे तत्त्व मान्य करून महाराष्ट्रात व इतर काही राज्यात काही भागात २००७ पासून 'सार्वजनिक आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरख' हा कार्यक्रम चालू आहे. त्याचा सकारात्मक अनुभव लक्षात घेता हा कार्यक्रम सार्वत्रिक करा. रुग्ण हा शरीराने, मनाने हतबल असतो म्हणून त्याच्याशी संवेदनशीलतेनेच वागायला हवे हे तत्त्व वरिष्ठ डॉक्टरांपासून सर्वांनी व्यवहारात आणणारी कार्यशैली रुजवा, बंधनकारक करा. जन-सहभागातून विकेंद्रीत नियोजनाची पद्धत रुजवा. तसेच ***मंत्रालायासकट उच्च, पातळीपर्यंतच्या कारभारावरही ही लोकाधारित देखरख/ व त्यातील जनसुनवाई*** असेल असे धोरण घ्या.

दुसरी महत्त्वाची सुधारणा म्हणजे मुंबईपासून तालुक्यापर्यंत ***फक्त वरून आदेश सोडणे ही कामकाजाची पद्धत बंद करून सार्वजनिक यंत्रणांचे अंतर्गत लोकशाहीकरण करा. निर्णय घेताना डॉक्टर्स व इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग घ्या.***

या यंत्रणेतील विशेषतः सफाई कर्मचारी आदी कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करा. या सेवांबाबतच्या निर्णयांचे अतिरिक्त केंद्रीकरण होऊन मंत्रालयातील बाबूंचे राज्य चालू आहे. त्यामुळे लोकांच्या लक्षात येणार नाही असा मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व्हायला अधिक वाव राहतो. वरिष्ठ पातळीवरच्या मुंबईतील निर्णयात खाजगी कंपन्या व इतर खाजगी हितसंबंध यांचा हस्तक्षेप होतो. तो थांबवा. ही निर्णय-प्रक्रिया शक्य तेवढी पारदर्शी व उत्तरदायी करा.

### ५. सार्वजनिक आरोग्यसेवा चांगल्या दर्जाच्या, पुरेशा असल्याच पाहिजेत असे धोरण घ्या.

सार्वजनिक आरोग्यसेवा या म्हणजे सुमार दर्जाची सेवा हा समाज दूर होण्यासाठी त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी खास नियोजन करा. अनेक सार्वजनिक इस्पितळांमध्ये चांगल्या दर्जाच्या सेवा मिळतात. उदा. लष्करासाठी असलेल्या सेवा चांगल्या दर्जाच्या असतात व जवानांपासून अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांना त्या मिळतात. अपघातात जखमी झालेल्यांना मुंबईतील सायन इस्पितळ हे एके काळी खाजगी इस्पितळापेक्षा दर्जेदार सेवा देई. अशा उदाहरणांपासून शिकून बाकी सर्व सार्वजनिक आरोग्यसेवाही चांगल्या दर्जाच्याच असल्या पाहिजेत असे धोरण घ्या.

दर्जेदार प्राथमिक आरोग्यसेवा पुरवण्याला प्राधान्य द्या. उदा. गरोदरबाईला आवश्यक असणाऱ्या तपासण्या, औषधे यापैकी आज निम्म्याच मिळतात. अशी हेळसांड बंद करायचे धोरण घ्या. ग्रामीण व शहरी सेवा यात भेदभाव करू नका.

### ६. दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक, स्त्रिया अशा वंचित घटकांनाही या दर्जेदार सेवा नक्की, मिळतील हे सुनिश्चित करा. त्यासाठी खास लक्ष द्या, निकष बनवा.

वरील वंचित घटकांप्रमाणे देहविक्रिय व्यवसायात असलेल्या महिला आणि एच. आय.व्ही. सह जीवन जगत असलेल्या व्यक्तीं ह्यासुद्धा दुर्लक्षित आणि वंचित आहेत. या सर्व वंचित घटकांना सामाजिक सेवा, सुरक्षा यांची सर्वात जास्त गरज असते. पण नेमके तेच अशा सेवांमधून सर्वात जास्त वगळले जातात. वंचित घटकांना सेवा मिळाली तरच 'सर्वांसाठी आरोग्यसेवा' हे ध्येय गाठले जाईल हे लक्षात घेऊन त्यांना या सेवा नक्की पोचण्यासाठी धोरण घ्या. या धोरणाच्या अंमलबजावणीचा निश्चित निकषांच्या आधारे आढावा घेण्याची व्यवस्था करा.



## ४. सर्वांना मोफत, चांगले, समान दर्जाचे शिक्षण मिळालेच पाहिजे!

भारतात ब्राह्मण्यवादी संस्कृतीने हजारो वर्षांकरिता शिक्षण फक्त ब्राह्मण व काही राजे-राजवाडे यांच्यासाठी आरक्षित केले. गेल्या दीडशे वर्षात, विशेषतः स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा बराच प्रसार झाला तरी स्वातंत्र्य मिळून ६७ वर्षे होऊनही शिक्षणाचा हक्क अजूनही अस्तित्वात आलेला नाही. राज्यघटनेच्या कलम ४५ ने शासनाला १९६०च्या आत १४ वर्षे वयापर्यंतच्या सर्व मुला-मुलींना सक्तीचे आणि मोफत शिक्षण देण्यासाठी निर्देशक तत्त्व आखून दिले होते. या निर्देशक तत्त्वामध्येच सहा वर्षे वयापर्यंतच्या मुला-मुलींचे फक्त पूर्व प्राथमिक शिक्षणच नाही, तर त्या शिक्षणाकरिता आवश्यक आरोग्य, पोषण यांचाही समावेश होता.

परंतु २०११ च्या जनगणनेनुसार भारतात साक्षरतेचे प्रमाण ७४ टक्के आहे, आणि महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण ६५ टक्के आहे. तसेच आजही उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण २० टक्केच्या आसपासच आहे. म्हणजेच आजही सर्व नागरिकांना व विशेषतः महिला, मागासवर्गीय यांना शिक्षणाच्या संधी देण्यापासून भारत अनेक मैल दूर आहे.

या आकड्यांपलीकडचे अजून कटू वास्तव हे आहे की १९९१ नंतर लागू केलेल्या खाउजा (खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण) धोरणांमुळे शिक्षण दिवसेंदिवस अतिशय महागडे आणि सर्वसामान्यांच्या हाताबाहेर जात चालले आहे. शिक्षणाचे उद्दिष्ट एक प्रबुद्ध मानव तयार न करता फक्त बाजारासाठी चांगले कामगार तयार करणे इतकेच ठरवले आहे. या शिक्षणाच्या बाजारीकरणाची दुसरी बाजू म्हणजेच विद्यार्थ्यांच्या खरेदी-क्षमतेनुसार सर्व स्तरावरील शिक्षणाच्या दर्जात वाढणारी विषमता. सरकार शिक्षणक्षेत्रातून पाय काढून घेत आहे आणि शिक्षणाच्या बाजाराला प्रोत्साहन देणारी धोरणे राबवत आहे.

### खाउजा धोरणांमुळे झालेले परिणाम

खाउजा धोरणांना सुरुवात झाल्यानंतर भारताच्या शिक्षण क्षेत्रात अनेक नव-उदारमतवादी बदल शासकीय धोरणांच्या माध्यमातून घडवण्यात आले आहेत. उदाः

- सरकार शिक्षणावरचा खर्च कमी करत चालले आहे, व नियंत्रणही संपवत चालले आहे.
- खाजगी धंदेवाईक शिक्षण संस्थांवर कोणतेही नियंत्रण न आणता त्यांना धंद्याची

मोकळीक दिली जात आहे.

• शिक्षणाचा खर्च सरकारने नाही तर मुख्यतः विद्यार्थ्यांनी करावा या तत्त्वाला मान्यता दिली गेली आहे.

• कॉर्पोरेट कंपन्यांना शिक्षण क्षेत्रात धंद्याची मोकळी सूट दिली जात आहे.

• कंत्राटी शिक्षक, पात्रता नसलेले अर्ध-शिक्षक, आणि पैसे वाचवण्यासाठी शिक्षण-सेवकांची भरती केली जात आहे.

• हजारोंच्या संख्येने मराठी सरकारी शाळा बंद केल्या जात आहेत, खाजगी-सार्वजनिक भागीदारीच्या नावाने खाजगी क्षेत्राकडे सोपवल्या जात आहे.

• अभ्यासक्रम, शिक्षक नियुक्त्या, विद्यार्थी प्रवेश, परीक्षा इत्यादी बाबतीत सरकारी नियंत्रणे सैल करून खाजगी क्षेत्राला मोकळीक दिली जात आहे. इत्यादी.

संरचनात्मक बदलांच्या नावाखाली जागतिक बँकेने लादलेल्या अटी, गॅटस कराराच्या अटी, बिर्ला-अंबानी अहवाल (२००२), नॉलेज कमिशनचे विविध अहवाल, निगवेकर समिती ते यशपाल समिती सारखे अनेक अहवाल, महाराष्ट्रातील व इतर राज्यांमधील खाजगी विद्यापीठांचा कायदा, असे अनेक कायदे/अहवाल/धोरणे पुढे आली आहेत. याशिवाय उच्च शिक्षण क्षेत्रात येऊ घातलेले अनेक नवीन कायदे, उदाः विदेशी विद्यापीठांचा कायदा, एन.सी.एच.ई.आर. बील, शैक्षणिक लवादांचा कायदा (Educational Tribunals Bill), गैर प्रकारांना आळा घालणारा कायदा असे अनेक कायदे विविध मार्गांनी शिक्षणातील बाजारीकरणाला प्रोत्साहन देणारे आणि शिक्षणातील व्यापाराला चालना देणारे आहेत.

| तक्ता : शिक्षणावरील खर्च राष्ट्रीय उत्पादनाच्या % मध्ये | |
|---|---|
| भारत | ३.३२ |
| नेपाळ | ४.७२ |
| रवांडा (आफ्रिका) | ५.०० |
| ऑस्ट्रेलिया | ५.१२ |
| कॅनडा | ५.५० |
| घाना (आफ्रिका) | ५.५४ |
| अमेरिका | ५.६२ |
| फ्रान्स | ५.९० |
| केनिया (आफ्रिका) | ६.६७ |
| बोलिविया (द. अमेरिका) | ७.६० |
| नामिबिया (आफ्रिका) | ८.३७ |
| क्युबा | १२.८६ |

आज शिक्षण क्षेत्र नियंत्रित करण्याची सरकारची कोणतीही इच्छा दिसून येत नाही. या संदर्भात 'जगण्याच्या हक्काचे आंदोलन' खालील मागण्या करत आहे.



## १. शिक्षणावरील सरकारी खर्च त्वरित वाढला पाहिजे

भारत सरकारने नेमलेल्या कोठारी आयोगाने १९६६ मध्ये शिक्षणावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६% खर्च करावा असे सांगितलेले असतानाही, हा खर्च बहुतेक वेळी ४% पेक्षा कमी राहिला व आजही ३%च्या आसपासच घोटाळत आहे. 'सरकारने शिक्षणावर खर्च न करता तो मुख्यतः विद्यार्थ्याने केला पाहिजे' या धोरणाला लागू करत कायम विना-अनुदानित तत्त्वावरच्या शाळा, महाविद्यालये व कायम विना-अनुदानित विविध डिग्री कोर्सेस चालवले जात आहेत. या बाजारीकरणाच्या धोरणामुळेच अजूनही ० ते १८ वयापर्यंत (१२ वी पर्यंत) मोफत शिक्षणाचा हक्क प्रत्येक मुलाला मिळावा यासाठी आवश्यक खर्चाची कायदेशीर तरतूद केली गेलेली नाही.

## विकसित देशांमधील स्थिती

सार्वत्रिक शिक्षणाशिवाय कोणताही देश विकसित होऊच शकत नाही. भारत शिक्षणावर सर्वात कमी सार्वजनिक खर्च करणाऱ्या देशांमध्ये मोजला जातो. विकसित देशांमधील शिक्षणावरील खर्च तर भारतापेक्षा जास्त आहेच, उलट भारतापेक्षाही गरीब समजले जाणारे आफ्रिकेमधील देश आणि अतिशय लहान देशही भारताच्या कैकपटीने शिक्षणावर सार्वजनिक खर्च करतात हे शेजारच्या तक्त्यातून स्पष्ट होते.

कपिल सिब्बल समिती (२००५)नुसार प्रारंभिक शिक्षणाचा (पहिली ते आठवी) मूलभूत अधिकार देण्यासाठी सन २००६-०७ ते २०११-१२ सरासरी फक्त ७२,७४३ कोटी रुपये अधिक खर्च दरवर्षी झाला असता. शिक्षणासाठी पैसे नाहीत ही सरकारची ओरड नेहमीचीच आहे. पण एका बाजूला श्रीमंतांना अंदाजपत्रकामध्ये दरवर्षी ५ लाख कोटींपेक्षा जास्त कर माफी देणारे, कॉमनवेल्थ गेम्सवर जवळपास २ लाख कोटी रु. खर्च करणारे सरकार जेव्हा शिक्षणासाठी पैसे नसल्याचे कारण पुढे करते, तेव्हा ती जनतेची फसवणूक आहे. गेल्या अनेक वर्षांचा अनुशेष लक्षात घेता शिक्षणावरील खर्चात भरघोस वाढ करणे अत्यावश्यक आहे.

त्यामुळे शिक्षणावरील खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६% त्वरित करण्यात यावा. अशी मागणी आम्ही करत आहोत.

## २. शिक्षणाच्या दर्जामध्ये भेदभाव नको, सर्वांना मोफत शिक्षण हवे

एका बाजूला लाखो रुपये फी घेणाऱ्या महागड्या /आंतरराष्ट्रीय शाळा/ आणि दुसऱ्या बाजूला फळा आणि वर्गखोली नसणाऱ्या सरकारी शाळा अशी भयावह विषमता आज शिक्षण क्षेत्रात दिसून येते. केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये, विद्यानिकेतन, अशा विविध नावांनी आज सरकार स्वतःच विविध प्रकारच्या व विविध दर्जांच्या शाळा चालवताना दिसते. शिक्षणाचा हक्क हा 'असमान शिक्षणाचा हक्क' असूच शकत नाही. त्यामुळे सर्व मुला-मुलींना समान दर्जाचे शिक्षण देणे हे

सरकारचे कर्तव्य आहे. जीवनात विकासाची समान संधी मिळण्यासाठी सर्वांना समान दर्जाचे शिक्षण अत्यावश्यक आहे.

अशा प्रकारचे समान दर्जाचे शिक्षण सर्व मुलांना मोफतच मिळायला हवे, अगदी श्रीमंतांच्या मुलांनाही. तसे जर नाही केले, तर श्रीमंत नेहमीच आपल्या मुलांसाठी जास्त चांगल्या दर्जाच्या शाळा काढतील आणि शिक्षणाच्या दर्जातील तफावत कायम राहील.

जगातील सर्वात बलशाली आणि विकसित म्हटली जाणारी आठ राष्ट्रे (अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, जपान, फ्रान्स, जर्मनी, इटली आणि रशिया) ज्यांना जी-८ म्हटले जाते, त्यांच्यापैकी ब्रिटन वगळता सर्व देशांमध्ये शासकीय मदतीवर चालणारी, सुव्यवस्थित सार्वजनिक शाळा व्यवस्था आहे. अमेरिकेमध्येही गेली दीडशे वर्षे सार्वजनिक शाळा व्यवस्था आहे, जिथे गरीब-श्रीमंत आणि विविध धर्म, भाषा, पंथाची मुले एकाच शाळेत शिकतात, ज्यांना शेजार शाळा म्हणतात. तिथे खाजगी शाळा तर नाममात्रच आहेत.

भारतासारख्या विविध भाषा, धर्म असलेल्या देशामध्ये, राज्यघटनेनुसार दिलेले धार्मिक, सांस्कृतिक स्वातंत्र्य आणि विविधता टिकवेल अशाप्रकारेच समान दर्जाचे शिक्षण दिले गेले पाहिजे. समान दर्जाचे शिक्षण म्हणजे सर्वांना एकाच प्रकारचे शिक्षण असा होत नाही. प्रत्येक राज्याचा भूगोल, इतिहास, भाषा, संस्कृती हे लक्षात घेता व अल्पसंख्यांकांचे हक्क लक्षात ठेवून समान दर्जाचे शिक्षण देण्यात यावे.

शिक्षणाचा हक्क सर्वांना समान दर्जाच्या शिक्षणाचाच हक्क असला पाहिजे अशी मागणी आम्ही करत आहोत.

### ३. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी पावले टाका.

खाजगी शाळा/कॉलेजांचा धंदा जोरात चालावा म्हणून एका बाजूला सरकारी शिक्षणव्यवस्थेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले आहे. यामुळेच २०-२५ वर्षांपूर्वी चांगल्या मानल्या जाणाऱ्या सरकारी शाळाव्यवस्थेला आता सामान्य माणसेच अतिशय वाईट मानू लागले आहेत व मजबुरी म्हणूनच सरकारी शाळांमध्ये प्रवेश घेतला जातो. पोटाला चिमटा घेऊन आज गरीब, सर्वसामान्य माणसं आपल्या मुलांना खाजगी शाळांमध्ये घालत आहेत. म्हणजे लोकांमध्ये शिक्षणाच्या गरजेची जाणीव मोठ्या प्रमाणात आहे, पण सरकारची त्याला साथ नाही.

आजही हजारो सरकारी शाळांमध्ये फळे नाहीत, वर्गखोल्या नाहीत किंवा कमी आहेत, आणि गरजेपेक्षा कमी शिक्षक आहेत. या मूलभूत सुविधा पुरवण्याबरोबरच सर्व सरकारी शाळांमध्ये खेळ, संगीत, कला, संगणक तंत्रज्ञान इ. शिकण्यासाठी सोयी पुरवणे; वीज, स्वच्छतेची व पिण्याच्या पाण्याची सोय उत्तम करणे, माध्यान्ह अन्नाचा



दर्जा उंचावणे, शाळा व्यवस्थित चालतात की नाही याची कसोशीने पाहणी करत राहणे, तसेच ४ अशा सर्व आघाड्यांवर उत्तम सोय करून शाळांचा दर्जा उंचावणे आवश्यक आहे. दर्जेदार शिक्षणासाठी भारतीय शाळांचा, विशेषतः मराठी शाळांचा दर्जा प्राधान्याने उंचावला पाहिजे. अशा शाळांमध्ये इंग्रजी भाषा चांगली शिकवण्याची सोय असली पाहिजे.

विना-अनुदानित शाळा एकतर खूप महागड्या आहेत किंवा सुमार दर्जाच्या आहेत. अशा सर्व शाळांना त्वरित सरकारी अनुदान लागू केले गेले पाहिजे व त्यांचा सर्व सरकारी शाळांच्या बरोबरीने दर्जा सुधारण्यासाठी मदत केली पाहिजे. नवीन मराठी शाळांना मान्यता व अनुदान त्वरित चालू केले पाहिजे.

### ४. शाळांच्या व्यवस्थापनामध्ये पालकांचा सहभाग सक्रियपणे लागू करा.

पालकांचा सरकारी शाळेच्या व्यवस्थापनामध्ये सहभाग असावा म्हणून 'शाळा व्यवस्थापन समित्या' स्थापन करण्यात आलेल्या असल्या, तरीही सर्वत्र या समित्यांची अवस्था अतिशय दयनीय आहे. बहुतेक ठिकाणी या समित्यांच्या मीटिंग नियमितपणे होत नाहीत व समित्या फक्त कागदावरच असल्याचे दिसून येते. एका बाजूला पालकांची अनास्था तर आहेच, परंतु शाळेचा कारभार व्यवस्थित चालत नसल्यास कारवाई करण्याचे अधिकार या समित्यांकडे नाहीत असेच दिसून येते. महानगरपालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या विरोधात तक्रार करणे, त्यांच्या निर्णयप्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचे अधिकार या समित्यांकडे नाहीत. तेव्हा या समित्यांचे अजून लोकशाहीकरण व सक्षमीकरण करण्यात यावे. तसेच शाळा चालवण्यामध्ये त्यांना निर्णायक अधिकार देण्यात यावेत अशी मागणी आम्ही करत आहोत.

### ५. सरकारी शिक्षण व्यवस्थेचे कंपनीकरण, कंत्राटीकरण, खाजगी–सार्वजनिक भागीदारी थांबवा.

सरकारी शाळांचा दर्जा जाणीवपूर्वक घसरवल्यानंतर आता सरकारने 'त्या चांगल्या चालत नाहीत, लोकांना आवडत नाहीत' असे सांगत त्यांचे कंपनीकरण चालू केले आहे. मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या अखत्यारीतील सर्व ११७४ शाळांना विविध कंपन्या, एन.जी.ओ. यांना चालवण्यास देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. पुणे महानगरपालिकेने त्याअगोदरच ४ शाळा 'थरमॅक्स' कंपनीच्या 'आकांक्षा' या एन.जी.ओ.ला चालवण्यास दिल्या आहेत. याशिवाय पुण्यातील सर्व बालवाड्या चालवण्याचे काम 'दिपक फाऊंडेशन' या 'दिपक फर्टीलायझर' कंपनीच्या एन.जी.ओ.ला देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. 'खाजगी-सार्वजनिक भागीदार' अशा गोंडस नावाखाली जनतेच्या मालकीच्या सरकारी शाळा आणि त्यांची कोट्यवधी

रुपये किंमतीची जमीन बिल्डर, उद्योगपतींच्या घशात घालण्याचे काम चालू आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी व नंतरही अनेक वर्षे गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण मिळावे या हेतूने अनेक लोकांनी खाजगी परंतु धंदेवाईक नसलेल्या शिक्षण संस्था काढल्या. या संस्था सरकारी अनुदानावर चालत असत. परंतु आता खाजगी शिक्षण हे फक्त पैसा कमावण्याचे साधन बनले आहे. आज बहुतांश खाजगी शाळांमध्ये अपात्र शिक्षकांची भरती, कंत्राटी शिक्षकांची भरती केली जाते व नाममात्र पगारात काम करवले जाते. एवढेच नाही तर शासनही स्वतः कंत्राटी तत्त्वावर शिक्षकांची नेमणूक करत आहे, 'शिक्षण सेवक' सारखी अतिशय कमी पगाराची पदे निर्माण करून शिक्षकी पेशाचे अवमूल्यन करत आहे आणि भेदभाव करत आहे. हे कंत्राटीकरण थांबवल्याशिवाय शिक्षणव्यवस्थेचा दर्जा सुधारू शकत नाही.

सरकारी शाळा सुधारणे दूरच, उलट सरकार २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या हजारो शाळा बंद करत आहे, यामुळे फक्त खाजगी धंदेवाईक शाळांचाच फायदा होणार आहे व सरकारी शिक्षणव्यवस्था मोडीत निघणार आहे. सरकारी शाळांमध्ये पटनोंदणी वाढवण्यासाठी शाळांचा दर्जा सुधार, नोंदणी अभियान, कडक तपासणी अशी पावले उचलण्याची गरज आहे.

लोकांना मोफत शिक्षण देण्याचे काम कोणतीही एन.जी.ओ. किंवा कंपनी करूच शकत नाही. त्यासाठी लागणारा निधी पुरवण्याचे काम नफेखोर कंपन्या का करतील? हे काम पूर्णतः सरकारी खर्चाने चालणारी शिक्षणव्यवस्थाच करू शकते. हे लक्षात घेता सरकारी शाळांचे कंपनीकरण त्वरित थांबवण्याची आम्ही मागणी करत आहोत.

### ६. दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक, महिला यांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करा.

राज्यघटनेच्या कलम ४६ ने मागासवर्गीय जाती आणि जमातींकरिता विशेष सुविधा पुरवण्यासाठीही निर्देश घालून दिले होते. परंतु २००१ च्या जनगणनेनुसार मागासवर्गीय जातीतील लोकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण ४६% आणि मागासवर्गीय जमातीतील लोकांमध्ये ५१% असे होते (२०११ चे आकडे उपलब्ध नाहीत). अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण २०११ मध्येही फक्त ६५% च आहे. त्यामुळे दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक, महिला या सर्व वर्गांसाठी विशेष प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे. सच्चर आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी; दलित, आदिवासी व मुलींना शिकण्यासाठी प्रवासाची सोय उपलब्ध करून देणे; शालेय शिक्षणामध्ये वंचित घटकांना भरघोस शिष्यवृत्त्या देणे अशाप्रकारची पावले या घटकांमधील प्रत्येक व्यक्तीसाठी उचलली गेली पाहिजेत.



वरील सर्व बाबी लक्षात घेऊन शिक्षण क्षेत्रात खालील मागण्या करत आहोत-

- वय ० ते १८ पर्यंत सर्व शिक्षण पूर्णतः मोफत व सरकारी खर्चाने देण्यासाठीचा कालबद्ध कार्यक्रम आखा.
- समान दर्जाचे शिक्षण सर्वांना मिळावे म्हणून धोरणाची कालबद्ध आखणी करा.
- शिक्षणावरचा सरकारी खर्च ताबडतोब कोठारी आयोगाने म्हटल्याप्रमाणे कमीत कमी ६% करा.
- सरकारी शाळांच्या छुप्या खाजगीकरणाचे सरकारी-खाजगी भागीदारी तत्त्व रद्द करा.
- सरकारी शाळांचे लोकशाहीकरण करून, 'शाळा व्यवस्थापन समितीला' निर्णायक अधिकार द्या.
- शिक्षणक्षेत्रात कंत्राटी पद्धतीवर बंदी घालावी.
- मुंबई, पुणे मनपा आणि राज्यात इतरत्र चालू असलेले सरकारी शाळांचे कंपनीकरण, कंत्राटीकरण त्वरित रद्द करा.
- पटसंख्येचे कारण देऊन सरकारी मराठी शाळा बंद करणे थांबवा व सरकारी शाळांमध्ये पटनोंदणी वाढवण्यासाठी शाळांचा दर्जा सुधार, नोंदणी अभियान, कडक तपासणी अशी पावले उचला. संसदेत प्रस्तावित असलेले शिक्षणाचे बाजारीकरण वाढवणाऱ्या कायद्यातील तरतुदी रद्द करा.

# ५ स्वस्त, पुरेशी सार्वजनिक बससेवा सर्वांना मिळालीच पाहिजे!

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या सोबतच स्थानिक प्रवास ही आज आवश्यक बाब बनली आहे. रोजगारासाठी व इतर कारणांसाठी रोज प्रवास करणे ही सर्व नागरिकांची, विशेषतः शहरी भागातील नागरिकांची गरज बनली आहे. 'बॉंबे प्रोविंशिअल म्युनिसिपल कॉर्पोरेशन्स ॲक्ट' (१९४९) नुसार सार्वजनिक वाहतूक सेवा पुरवणे हे सर्व महानगरपालिकांचे कर्तव्य आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील पुणे, मुंबईसारख्या अनेक शहरांनी स्वातंत्र्यानंतर सार्वजनिक शहरी वाहतुकीची सोय निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

१९९१ मध्ये खाउजा धोरणे लागू होण्याअगोदर महाराष्ट्रातील बहुतांश सर्व मोठ्या शहरांमध्ये अशाप्रकारची सेवा पुरवली जात होती. मुंबईचा अपवाद वगळता ती आधीच अपुरी होती. त्यात सुधारणा होण्या-ऐवजी 'खाउजा' धोरणामुळे गेल्या २० वर्षांमध्ये अनेक शहरांमध्ये हा सेवेचा दर्जा खालावत चाललेला दिसून येतो. सार्वजनिक बस सेवेचे जाणीवपूर्वक खच्चीकरण करून लोकांना खाजगी वाहनांकडे वळवून खाजगी वाहन उद्योजकांचे हित जोपासण्याची धोरणे राबवली जात आहेत.

भारताचे 'राष्ट्रीय नागरी वाहतूक धोरण' सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देण्याचे व खाजगी वाहतुकीवर निर्बंध आणण्याचे असतानाही, त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करत उलटी धोरणे राबवली जात आहेत. राष्ट्रीय धोरण राबवण्याच्या नावाखाली खरेतर स्थानिक बिल्डर व मोटार वाहतूक लॉबीचे स्वार्थ जपण्याचेच काम केले जात आहे.

या धोरणांचे दृश्य स्वरूप खालीलप्रमाणे दिसून येते-

१. शहरांमध्ये बसची/लोकलची संख्या वाढत्या गरजांच्या प्रमाणात न वाढवणे व या सेवांचे जाणीवपूर्वक खच्चीकरण करणे.

२. सार्वजनिक प्रवास महाग करणे, अनेक बाबतीत खाजगी वाहनापेक्षाही महाग करणे. पुण्यासारख्या शहरात बससेवा अतिशय महाग असल्यामुळे कष्टकरी वर्गातील बहुसंख्य लोकांना पायी फिरावे लागते.

३. सार्वजनिक वाहतुकीमध्ये खाजगीकरण, पीपीपी धोरण व नफ्याचे तत्त्व लागू करून, कल्याणकारी धोरणांना पायदळी तुडवणे.

४. रस्ते, उड्डाणपूल, स्वस्त/मोफत पार्किंग अशा पायाभूत सुविधांवर अफाट



खर्च करून खाजगी वाहतुकीला सोयी पुरवणे.

या परिस्थितीमध्ये सर्व शहरांमध्ये सार्वजनिक बस वाहतुकीच्या संदर्भात खालील मागण्या आम्ही मांडत आहोत-

## १. सर्वांना परवडतील अशा दरात बससेवा पुरवण्यात यावी.

दिवसेंदिवस बससेवा महाग होत चालली आहे, ज्याचे मुख्य कारण आहे शासनाचा बस-सेवेवरच्या खर्चाच्या आणि बस-सेवेवरच्या अनुदानात वाढ न होणे. उदाहरणार्थः पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका पूर्वी पीएमटी आणि पीसीएमटी या आपापल्या बस सेवा चालवत असत. परंतु २००७ मध्ये या दोन्ही सेवांचे सुसूत्रीकरण्याच्या निमित्ताने दोन्ही संस्थांना एकत्र करून पीएमपीएमएल (पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड), या कंपनीची स्थापना करण्यात आली. स्थापनेच्या वेळेस पुणे मनपाने जाहीर केले आहे की मनपा काही वर्षेच पीएमपीचा भार वाहील व नंतर पीएमपीने आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र व स्वायत्त व्हावे.

खरेतर असे सांगून मनपा सार्वजनिक वाहतूक सेवेच्या आपल्या जबाबदारीपासून हात झटकून टाकत आहे. कल्याणकारी राज्याच्या कल्पनेला या तत्त्वाने तिलांजली दिली आहे या तत्त्वामुळेच आज बससेवा पुरवणाऱ्या संस्था प्रवाशांकडून चढ्या दराने वसुली करत आहेत. मुंबईतील बेस्ट, पुण्यातील पीएमपीएमएल, किंवा कल्याण-डोंबिवली येथील केडीएमटी अशा सर्वच बस सेवांचे दर वाढलेले आहेत.

सर्वसामान्य माणसाला परवडेल अशा दरात बससेवा पुरवण्याची ठरवल्यास ती तोट्यात जाऊच शकते. अशा प्रकारच्या तोट्याला भरून काढण्यासाठीच विविध मार्गांनी जनतेने सरकारला हजारो कोटी रुपयांचा कर दिलेला आहे. परंतु आज शासन सांगत आहे की सरकारी सेवा सुद्धा नफा तत्त्वावर देण्यात याव्यात. सर्वांना परवडणाऱ्या बससेवेसाठी आम्ही मागणी करत आहोत की,

*रु. १ ते कमाल रु. १० किंवा त्यापेक्षाही कमी असे तिकीट दर ठेवून सार्वजनिक बससेवा पुरवा. त्यात होणारा तोटा स्थानिक स्वराज्य संस्थांनी भरून काढा.*

## २. स्थानिक प्रशासनामार्फत बससेवेवरील खर्चात लगेच भरीव वाढ करा; खाजगी वाहनांवर कर लावून सार्वजनिक बससेवेला अनुदान द्या.

सर्वांना परवडणारी सार्वजनिक बस वाहतूक सेवा पुरवण्यासाठी जो भांडवली खर्च करावा लागतो (उदा. बस खरेदी, डेपो बांधणे, इत्यादी) आणि ती सेवा परवडावी म्हणून जे अनुदान द्यावे लागते, त्यासाठी शासनाने अनुदान देणे अपेक्षितच आहे.

उदाहरणार्थः पुणे-पिंपरी महानगराची लोकसंख्या जवळपास ५० लाख झालेली आहे. इतक्या लोकसंख्येला प्रति लाख लोकांमागे ५५ या दराने व वेळप्रसंगीची गरज लक्षात घेता कमीतकमी ३००० बसेसची आवश्यकता आहे. परंतु पुणे महानगरात रस्त्यावर धावणाऱ्या बसेसची संख्या फक्त १२००च्या जवळपास आहे. यावर लागणाऱ्या बसेस घेण्यासाठी जवळपास रु. ३०० कोटी पुरेसे आहेत. परंतु सर्व सेवा 'बाजारी' पद्धतीने पुरवण्याच्या तत्त्वाला धरून पुणे मनपाने सतत पीएमपीच अनुदान कमी करत गेल्या वर्षी फक्त रु.५० कोटी इतके ठेवले आहे. रु. ३००० कोटींपेक्षा जास्त वार्षिक अंदाजपत्रक मांडणाऱ्या मनपाकडे बससेवेसाठी फक्त ५० कोटी रुपये आहेत.

'वाहतूक प्रश्नाच्या' सोडवणुकीसाठी म्हणून पुणे मनपा जवळपास ८०० ते ९०० कोटी रुपये खर्च करते, ज्यापैकी जवळपास सगळीच रक्कम रस्तेबांधणी, रस्ते रुंदीकरण, उड्डाणपूल यावर खर्च केली जाते. शहराच्या शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक आरोग्य, उद्याने व बससेवा या सर्वांवर मिळून होणाऱ्या खर्चापेक्षा जास्त खर्च रस्त्यांवर केला जातो. रस्ते, उड्डाणपूल अशा बिल्डरपूरक गोष्टींवरील अफाट खर्चामुळेच आज शिक्षण, आरोग्य, स्वच्छता अशा सोयींसाठी खर्च केला जात नाही. पुण्यातील बसव्यवस्थेचे भांडवली खर्च वगळता अंदाजपत्रक जवळपास रु. ४५० कोटी आहे हे बघता, त्याच्या कमीतकमी ५०% तरी अनुदान पुणे व पिंपरी चिंचवड मनपांनी देणे अपेक्षितच आहे.

या उपर पुणे, मुंबई सारख्या शहरांमध्ये 'सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत करण्याच्या' नावाखाली मेट्रोसारखे अवाढव्य प्रकल्प राबवले जात आहेत. मुंबईमध्ये एका मेट्रोमार्गासाठी रु. ११,००० कोटींपेक्षा जास्त खर्च झाला आहे. परंतु बस/लोकल सारख्या स्वस्त सेवांसाठी पैसे नसल्याचे कारण दिले जाते. उदा. पुणे मेट्रोचा अंदाजे खर्च ३५,००० कोटींवर जाईल. याच्या तुलनेत पुरेशा २००० बस घेण्यासाठी जवळपास रु. ३०० कोटी हवेत व दरवर्षी २००-३०० कोटी रुपये अनुदानात स्वस्त बससेवा पुरवणे शक्य आहे. म्हणजे मेट्रोच्या १% खर्चात उत्तम बससेवा पुरवली जाऊ शकते. खरेतर बससेवेसारख्या स्वस्त सेवांची पूर्ण योग्य अंमलबजावणी केल्याशिवाय मेट्रो/मोनोरेल सारखे अतिमहागडे प्रकल्प लागू करणे हेच तत्त्वतः चूक आहे.

### खाजगी वाहनांची सार्वजनिक किंमत

रस्ते, उड्डाणपुलासारख्या सोयींचा वापर मुख्यत्वे मोटारी करतात, कारण त्या खूप जागा व्यापतात. सर्व जनतेच्या पैशातून श्रीमंतांना व त्यांच्या मोटारींना दिलेले हे अनुदानच आहे. सार्वजनिक व सर्वांच्या समान मालकीच्या रस्त्याचा जास्त वापर केल्याबद्दल त्याचा 'गर्दीकर' लावणे हे योग्यच आहे. ८०% मोटारी रस्त्यावरच रात्री पार्क केल्या जातात. त्यांच्यावर दर चौरस फुटाला व्यावसायिक दराने वार्षिक पार्किंग-



कर लावला पाहिजे. तसेच सार्वजनिक ठिकाणी व्यावसायिक दराने पार्किंग-कर लावला पाहिजे. लंडन, सिंगापूर सारख्या शहरांमध्येही असे कर लावले जातात. याशिवाय कारमुळे जे प्रदूषण होते त्याचा त्रास पादचारी, सायकलस्वार आणि मोटारसायकलस्वारांनाच जास्त होतो. त्याच्या आरोग्याची किंमत म्हणून 'आरोग्यकर' सुद्धा मोटारींवर लावण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या करातून येणारी रक्कम सार्वजनिक बससेवा मजबूत करण्यासाठी वापरली गेली पाहिजे. उदाहरणार्थः पुण्यासारख्या महानगरात ५ लाख कार आहेत, ज्यांच्यावर दरवर्षी रु. १०,००० इतका जरी गर्दीकर लावला तरी रु. ५०० कोटी जमा होतात, ज्यातून सार्वजनिक बससेवा (पीएमपीएमएल) पूर्णतः अनुदानित केली जाऊ शकते (पीएमपीएमएलचे बजेट रु. ४५० कोटीच आहे). तसेच सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या अंदाजपत्रकाचा कमीतकमी ५% भाग सार्वजनिक बससेवेसाठी खर्च करावा. खाजगी मोटारींवर गर्दीकर, आरोग्यकर लावून हा निधी सार्वजनिक बससेवेसाठी खर्च करायला हवा.

## ३. सार्वजनिक बस/लोकल सेवेचे खाजगीकरण, कंत्राटीकरण, सार्वजनिक–खाजगी भागीदारी त्वरित थांबवा.

इतर सर्व जीवनावश्यक सेवांप्रमाणे सर्वत्र बस, रेल्वे अशा वाहतूक सेवांचेही खाजगीकरण, कंत्राटीकरण चालू आहे. या मार्गाने जनतेची संपत्ती ठेकेदारांच्या हाती दिली जात आहे. मशिनमधून निघणारे ई-तिकीट काढण्याचे व बस पास वाटपाचे कंत्राटीकरण, भाडेतत्त्वावरील बसेस घेऊन चालवणे, कंत्राटी पद्धतीने कामगारांची भरती, बसस्थानकांवरील जाहिरातींचे काम ठेकेदारांना देणे, बस दुरुस्तीच्या कामाचे कंत्राट देणे, अशा अनेक पद्धतींनी तुकड्या-तुकड्याने सरकारने बससेवेचे खाजगीकरण केले. या पुढचे पाऊल म्हणजे बसस्थानकांना सुधारण्याच्या नावाने त्यांची हजारो कोटी रुपयांची जागा /खाजगी-सार्वजनिक भागीदारी या नावाने बिल्डरांच्या घशात घालण्याचे प्रयत्न चालू आहे.. पुणे मनपाने २०१२ मध्ये जनतेच्या पैशाने विकत घेतलेल्या ६५० बसेस खाजगी कंत्राटदारांना मोफत चालवण्यास द्यायचा प्रस्ताव आणलेला होता. अशा विविध प्रकारांनी शहरातील बससेवेचे पूर्ण खाजगीकरण करण्याचा प्रयत्न चालू आहे.

खाजगीकरणामळे सेवेचा दर्जा सुधारेल असा भ्रम पसरवला गेला आहे. नीट पाहिले तर अशा बससेवांमध्ये तर दर्जा निश्चितच खालावलेला दिसून येतो. दिल्लीमधे ब्लू लाईन बस खाजगी तत्त्वावर चालत होत्या, तेथे कामगारांवर कामाचा प्रचंड बोजा टाकल्याने त्यांनी इतके अपघात केले की त्यांना 'किलर ब्लू लाईन' नाव पडले.

कोणताही खाजगी गुंतवणूकदार नफ्यासाठीच गुंतवणूक करतो. त्यामुळे कमी प्रवासी संख्येचे मार्ग न चालवणे, पुरेसे प्रवासी नसताना बस न चालवणे, सुरक्षिततेची पुरेसी काळजी न घेणे, अप्रशिक्षित चालक नेमणे, अवास्तव तिकीट दरवाढ, खर्च वाढवून दाखवणे, बसच्या फेऱ्या केलेल्या नसतानाही वाढवून सांगणे अशा अनेक प्रकारांनी जनतेच्या पैशांची लूट खाजगीकरणामुळे होत आहे. पुण्यामध्ये बस पास छपाईच्या कामाचे कंत्राट दिल्यामुळे पूर्वी जे तिकीट १.५ पैशाला पडत असे आज ते १३ पैशाला पडत आहे. आर.टी.ओ.कडे 'बस पासिंग' जे पूर्वी ६००० रुपयात व्हायचे आता कंत्राटामुळे १७००० रुपयात होत आहे. खाजगीकरण म्हणजे अशाचप्रकारे जनतेच्या पैशांची उधळपट्टी आहे.

त्यामुळे शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये सर्व प्रकारच्या खाजगीकरण, कंत्राटीकरण, खाजगी-सार्वजनिक भागीदारीला आम्ही विरोध करतो आणि ही सेवा पुरवणे ही पूर्णतः शासनाचीच जबाबदारी आहे हे ठामपणे बजावतो आहोत.

## ४. सार्वजनिक बससेवा चांगल्या दर्जाची, सर्वत्र उपलब्ध असली पाहिजे.

स्थानिक प्रवास ही रोजची गरज असल्यामुळे, जर बसव्यवस्था समाधानकारक नसेल तर लोक आपसूकच खाजगी वाहन (मोटारसायकल, कार, इत्यादी) घेण्याचा विचार करतात. त्यामुळेच पुणे, मुंबईसारख्या शहरांमध्ये सार्वजनिक बससेवेचा दर्जा जाणीवपूर्वक घसरण्यात येत आहे, जेणेकरून खाजगी वाहनांच्या विक्रीचा धंदा जोरात चालावा. याचाच परिणाम म्हणून आज ५० लाख लोकसंख्येच्या पुणे महानगरात ३३ लाखापेक्षा जास्त खाजगी वाहने धावत आहेत.

दुसऱ्या बाजूला पुण्यामध्ये जवळपास ३०० बसेस नादुरूस्त म्हणून रस्त्यावर धावत नाहीत हे चित्र दिसते. रस्त्यावर धावणाऱ्या बसमध्येही आसनांची, खिडक्यांची अवस्था अतिशय वाईटच असते. बसच्या मार्गाचे नियोजन, वेळापत्रक आखणी, बसच्या फेऱ्यांचे नियोजन अशा अनेक बाबींमध्ये पुण्यासारख्या शहरांमध्ये अतिशय ढिसाळ नियोजन दिसून येते. राज्य शासन आणि स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पीएमपीएमएलच्या संचालक मंडळावर वर्षानुवर्षे तज्ज्ञांची नेमणूक करण्यातच येत नाही. बससेवेच्या दर्जाकडे हे अक्षम्य दुर्लक्ष जाणीवपूर्वक करण्यात येत आहे, जेणेकरून खाजगी वाहनांचा खप वाढावा. बससेवेसाठी संचालक मंडळावर तज्ज्ञ लोकांची नेमणूक लगेचच करून त्यांचे सुसूत्रीकरण करण्यात यावे अशी आम्ही मागणी करत आहोत.



## ५. लोकांचा सहभाग

ठिकठिकाणी बस प्रवासी संघटनांशी स्थानिक प्रशासनाने नियमित संवाद स्थापित केला पाहिजे व प्रवाशांच्या अडी-अडचणी जाणून घेत, सेवेत सतत बदल करण्याची भूमिका स्वीकारली पाहिजे. सध्या अशा प्रकारच्या संवादांचे रूप फक्त औपचारिकतेचे आहे. प्रवाशांच्या तक्रारी व मागण्या यांच्यावर विचार व कृती करण्यासाठी प्रवाशांच्या प्रतिनिधींसोबत नियमित समिती स्थापन झाल्या पाहिजेत, अशा समित्यांच्या कार्यपद्धतीबद्दल स्पष्टता आणून ती लागू केली पाहिजे.

## ६. ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, महिला, अपंग, कष्टकरी वर्ग यांना विशेष सेवा पुरवा..

सार्वजनिक वाहतूक सेवा सर्व नागरिकांना सोयीस्कर आणि उपलब्ध असली पाहिजे, या दृष्टीने विविध नागरी वर्गांसाठी विशिष्ट तरतुदी करण्यात याव्यात.

- कमी उत्पन्न गटातील लोक, कष्टकरी यांच्यासाठी सार्वजनिक वाहतूक मोफत केली पाहिजे. यासाठी लागणारे अनुदान स्थानिक प्रशासनाने पुरवावे. कमी उत्पन्न गटातील लोक ठरवण्याची प्रक्रिया कमीतकमी कागदपत्र लागणारी असली पाहिजे.
- ज्येष्ठ नागरिक, व विद्यार्थी यांना कोणताही इतर नियम न लावता नियमित बसभाड्याच्या निम्म्या रकमेत प्रवासाची सवलत उपलब्ध करून द्यावी.
- महिलांसाठी सर्वत्र निम्म्या जागा राखीव ठेवण्यात याव्यात, 'डावी बाजू महिलांसाठी, उजवी बाजू सर्वांसाठी' हे तत्त्व मनात रुजावे यासाठी कंडक्टर आणि ड्रायव्हर यांच्यासोबत चर्चासत्रांचे आयोजन करावे आणि नियमाची कडक अंमलबजावणी करण्यात यावी
- सर्व बसस्थानकांवर अपंगांना बसमध्ये चढणे सोयीचे व्हावे म्हणून बसच्या उंचीपासून 'उतरत्या रँपची' सोय करण्यात यावी.

# ६. सर्व कष्टकऱ्यांना म्हातारपणी हक्काचे पेन्शन मिळालेच पाहिजे!

भारतातील वृद्धांची संख्या वाढते आहे. २००१च्या जनगणनेनुसार ६० पेक्षा अधिक वयाचे ७ कोटी ७० लाख वृद्ध होते तर २०११ च्या जनगणनेनुसार ही संख्या १० कोटी होती. ते पूर्णपणे स्वावलंबी नसतात. त्यांना आपल्या रोजच्या गरजांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. सन्मानाने जगण्याचा हक्क हा मूलभूत मानवी हक्क आहे. वृद्धांना तो मिळाला पाहिजे. त्यासाठी वृद्धपणी पेन्शन हा हक्क मिळाला पाहिजे व त्यासाठी संस्थात्मक रचना सरकारने निर्माण केली पाहिजे. असंघटित क्षेत्रात आयुष्यभर काम करणाऱ्यांना तसेच स्वयंरोजगार करणाऱ्या फार मोठ्या लोकसंख्येला म्हातारपणी ही सुरक्षा मिळत नाही. पुरेसे आणि सकस अन्न मिळू शकत नाही. या कारणास्तव मृत्युमुखी पडतात अशांची इतर वयोगटाच्या तुलनेत वृद्धांची संख्या फार मोठी आहे. अनेक वृद्धांना एकटे, वेगळे राहण्याची वेळ येते. आपली मुले, नातवंडे यांच्या सोबत न राहता कधी वृद्ध नवरा-बायको तर कधी पूर्ण एकटेपणाने वृद्धांना लागते. आंध्रप्रदेश, तमिळनाडूत ३०% वृद्ध एकटे राहतात.

जगातील अनेक देशांनी सर्व वृद्धांचा पेन्शन हा एक हक्क म्हणून मान्य केला आहे. भारताचा दरडोई उत्पन्न ४०% अधिक आहे अशा मध्यम उत्पन्न गटातील बोलिव्हियामध्ये प्रत्येक वृद्ध व्यक्तीला १५००/- रुपये दरमहा पेन्शन सरकार देते. ब्राझिलसारखा विकसनशील देशही आपल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी ४.५% रक्कम पेन्शन योजनांसाठी खर्च करतो. फ्रान्स, जर्मनी, स्वीडन या सारखे युरोपातील प्रगत देश सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (का उत्पादनाच्या?) ७% च्या वर पेन्शनवर खर्च करतात. भारतापेक्षा ७५% दरडोई उत्पन्न कमी असलेल्या द. आफ्रिकेतील 'लेसोथो' हा देश कोणतीही वर्गणी न घेता दरमहा २३००/- रुपये पेन्शन सर्व वृद्धांना देतो. आपल्या पेक्षा ३०% कमी दरडोई उत्पन्न असणाऱ्या नेपाळमध्ये प्रत्येक वृद्ध व्यक्तीला सरकारने वर्गणी खेरीज ३१३/- रुपये देण्याचा पेन्शनचा हक्क मान्य केला आहे.

भारतात वर्गणी न भरता म्हातारपणी पेन्शन मिळण्याचा हक्क सरकार मान्य करत नाही याचे कारण आपल्या सरकारकडे देण्याची आर्थिक स्थिती नाही हे नसून राजकीय इच्छाशक्ती नाही हे आहे. या देशात असंघटित क्षेत्रातील कामगारांनी कमीत कमी वेतन / मोबदल्यात जन्मभर कष्ट करून सकल राष्ट्रीय उत्पन्नात नेहमीच ६०% पेक्षा अधिक असा भरघोस हिस्सा उचललेला आहे. असंघटित क्षेत्रतील हे कामगार, स्वयंरोजगारी, शेतीमध्ये अंगमेहनत करणारे हे विभाग जसे राष्ट्रीय उत्पन्नात/ उत्पादनात भरघोस भर घालतात. तसेच ते जेव्हा वस्तू खरेदी करतात तेव्हा त्या



वस्तूंवरील करही भरतात व या करामार्फत सरकारी तिजोरीत भर घालतात. म्हातारपणीही अशा अप्रत्यक्ष करामार्फत ते सरकारी तिजोरीत भर घालतात. मात्र पेन्शन नसल्याने याशिवाय हे श्रमिक म्हातारपणीही अतिशय निकृष्ट अन्न खाऊन, पुरेशी विश्रांती न घेता, प्रतिकूल परिस्थितीत काम करत राहतात.

युनोने १९४८ साली जागतिक मानवी हक्कांचा जाहीरनामा स्वीकारला. त्यात म्हातारपणी पेन्शन मिळण्याचा हक्क हा महत्त्वाचा सामाजिक सुरक्षा देणारा हक्क असल्याचे म्हटले आहे. सर्व वृद्धांना पेन्शनची सामाजिक सुरक्षा पुरविण्याची जबाबदारी त्या त्या देशाच्या सरकारची आहे असे 'जागतिक श्रम संघटने'ने १९५२ सालच्या सामाजिक सुरक्षा जाहीरनाम्यात म्हटले आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या ४१ व्या कलमात सरकारला धोरणात्मक दिशा दिग्दर्शन करताना म्हटले आहे की, वृद्धपणी होणारे आजार, विकलांगता यासाठी सामाजिक सुरक्षेचा हक्क देणाऱ्या तरतुदी सरकारने केल्या पाहिजे.

भारतातील ९३% कष्टकरी असंघटित क्षेत्रात काम करीत आहे. त्यांना सामाजिक सुरक्षा देण्याबाबत अभ्यास करून शिफारशी देण्यासाठी सरकारने राष्ट्रीय - असंघटित विभाग समितीचे गठण अर्जुनसेन गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली केले होते. या समितीने २००५ साली शिफारशी केल्या होत्या. त्यात असंघटित क्षेत्रातील ४२ कोटी कष्टकऱ्यांना विविध सामाजिक सुरक्षा पुरविण्याच्या त्यासाठी कायदे करून अंमलबजावणी यंत्रणा उभारावी अशा शिफारशी केल्या होत्या. म्हातारपणी पेन्शन देण्याची व त्यासाठी सरकारने आर्थिक तरतूद करण्याची शिफारस त्यात केली होती. सरकारने या शिफारशी पूर्णतः स्वीकारल्या नाहीत. असंघटित कष्टकऱ्यांना सामाजिक सुरक्षतेचे हक्क देणारे कायदे न करता केवळ मार्गदर्शक सूत्रांच्या रूपात असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायदा २००८ केलेला आहे. निधी आणि यंत्रणेअभावी तो पूर्णतः फक्त कागदावर आहे.

## दारिद्र्यरेषेखालील पेन्शन योजना

भारतातील कष्टकऱ्यांपैकी ज्यांची नावे २००२च्या दारिद्र्यरेषेखालील सूचीमध्ये नोंदवली आहेत, केवळ त्यांनाच इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्ध पेन्शन योजनेअंतर्गत पात्र ठरविण्यात येते. त्यातील ६० ते ७९ या वयोगटातील वृद्धांकरिता केंद्र सरकार दरमहा पेन्शन ५००/- रु. देते, या रकमेत राज्यसरकार भर घालून ही योजना राबविते. गोवा आणि दिल्ली सरकार यात ८००/- दरमहा प्रती व्यक्ती भर घालते. अनेक राज्य सरकार वेगवेगळी भर घालून दारिद्र्यरेषेखालील वृद्धांना पेन्शन देत आहे. आजही तो हक्क स्वरूपात मिळालेला नाही. या सूचीतील पात्र व्यक्तींपैकी अर्ध्या वृद्धांना पेन्शन मिळू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. इंदिरा गांधी वृद्ध पेन्शन योजनेद्वारे देशातील वृद्धांपैकी केवळ २१% वृद्ध लाभार्थी ठरतात. यांची डिसेंबर

२०१२ मधील संख्या २.२३ कोटी इतकी आहे.

६० वयापेक्षा अधिक वयाच्या पुरुषांना आणि ५५ वयापेक्षा अधिक वयाच्या स्त्रियांना पेन्शनचा हक्क विनाअट (वर्गणी न मागता) मिळलाच पाहिजे. किमान वेतनाच्या निम्मी किंवा रु.२०००/- यातील जी रक्कम अधिक असेल तेवढी पेन्शन दिली पाहिजे. ९०% वृद्धांना याचा लाभ देण्याचे निश्चित केले तर २०११च्या जनगणनेनुसार १४.४३ कोटी वृद्धांना हा लाभ मिळू शकतो, त्यासाठी सुमारे साडे-तीन लाख (३,४६,२८५) कोटी रु. दर वर्षी खर्च करावा लागेल. म्हणजे सकल राष्ट्रीय घरेलू उत्पन्नाच्या ३.४१ % निधी त्यासाठी राखून ठेवावा लागेल. २०१२-१३ च्या अर्थ संकल्पीय अंदाजपत्रकानुसार सकल राष्ट्रीय घरेलू उत्पन्न सुमारे एक लाख कोटी रु. (१,०१,५९,८८४) होईल. राष्ट्रीय घरेलू उत्पन्नाच्या ३.४१ % रक्कम पेन्शनसाठी ठेवणे हे आंतरराष्ट्रीय मानकानुसार जास्त ठरत नाही.

भारतात सरकारी निमसरकारी कामगारांना पेन्शनचा हक्क मान्य करण्यात आलेला आहे. पण औद्योगिक कामगारांना मात्र प्रॉव्हिडंड फंड आधारित पेन्शन योजना आहे. त्यातून मिळणारे पेन्शन अत्यंत अपुरे आहे. स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षे झाल्यानंतरही या देशातील सर्वांना पेन्शनचा हक्क येथील तथाकथित राज्याने दिलेला नाही. राज्यकर्त्यांची इच्छाशक्ती नसल्याने या देशातील कष्टकऱ्यांना म्हातारपणी अतिशय लाजिरवाणे जीणे जगावे लागत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर आम्ही मागणी करतो की -

१) विनाअट पेन्शन हा सर्व वृद्ध स्त्री-पुरुषांचा हक्क मान्य करा.

२) दारिद्र्यरेषेखाली किंवा वर असा व इतर कोणताही भेदभाव न करता ५५ वयानंतरच्या सर्व स्त्रियांना आणि ६० वर्षांनंतरच्या सर्व पुरुषांना विनाअट पेन्शन द्या.

३) दरमहा २०००/ रु. किंवा किमान वेतनाच्या ५०% या पैकी जी अधिक असेल अशी पेन्शन वर्गणी न भरता विनाअट द्या.

४) जे वृद्ध आयकर भरतात, ज्या वृद्धांना दरमहा २०००/ रु. पेक्षा अधिक पेन्शन मिळते त्यांना या सार्वजनिक पेन्शन योजनेतून वगळा.

५) दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी लाभार्थीच्या खात्यात पेन्शन जमा झाली पाहिजे.

६) पेन्शन बाबतच्या तक्रारींसाठी तक्रार निवारण मंच स्थापन करा.

७) पेन्शन योजनेचे दरवर्षी अंकेक्षण झाले पाहिजे.

८) लाभार्थींची नावे सातत्याने संकेतस्थळावर जाहीर करत राहिले पाहिजे.



नक्की पोचण्यासाठी धोरण घ्या. त्याच्या अंमलबजावणीचा निश्चित निकषांच्या आधारे आढावा घेण्याची व्यवस्था करा.

**विविध सामाजिक सेवा, सुरक्षा मिळवण्यासाठी विविध संघटना लढत आल्या आहेत. आता त्यासाठी सामाईक मागण्यांसाठी एकजुटीने व्यापक आंदोलन उभारायचे आहे. वरील सर्व मागण्या मान्य करायच्या तर सरकारला धनिक-धार्जिणे, खाजगी हितसंबंधियांना अनिर्बंध मुभा देण्याचे, खाजगीकरणाचे धोरण बदलावे लागेल. त्यासाठी मोठे, व्यापक, राजकीय-दृष्ट्या परिणाकारक आंदोलन उभारण्याचा आम्ही निर्धार करत आहोत.**

## जगण्याच्या हक्काचं आंदोलन

जागतिकीकरण विरोधी कृती समिती, कामगार संघटना संयुक्त कृती समिती (महाराष्ट्र राज्य), जागृत कामगार मंच, अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, जन आरोग्य अभियान, अन्न अधिकार अभियान, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सी.पी.आय.), भारताचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायत, मुंबई शिक्षण कंपनीकरण विरोधी अभियान, श्रमिक महिला मोर्चा, जनआंदोलनाचा राष्ट्रीय समन्वय, अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा, महाराष्ट्र राज्य किसान सभा, समाजवादी महिला सभा, सर्वहारा जनआंदोलन (रायगड), महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशन, महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघ, सीटू (सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन), कष्टकरी संघटना (डहाणू), शेतकरी शेतमजूर पंचायत समाजवादी जनपरिषद (औरंगाबाद), श्रमिक मुक्ती संघटना, पाणी हक्क समिती, शोषित जन आंदोलन, जागृत कष्टकरी संघटना (रायगड), श्रमिक मुक्ती दल (लोकशाहीवादी), न्यू ट्रेड युनियन इनिशिएटिव्ह, रेशन बचाव समिती, लोकायत (पुणे), पुणे शहर मोलकरीण संघटना, नवनिर्मिती, संग्राम संस्था (सांगली), निवारा बांधकाम कामगार संघटना, नर्मदा बचाओ आंदोलन (नंदुरबार), समता प्रतिष्ठान (बीड), ग्रामीण विकास परिषद (पैठण) (आर.सी.), जनस्वास्थ्य अभियान (मुंबई), कचरा वाहतूक श्रमिक संघ (मुंबई), असंघटित श्रमिक पंचायत, स्त्रीवाणी संघटना पुणे, कष्टकरी घरकामगार संघटना, आम आदमी पार्टी (महाराष्ट्र), मुंबई मोबाईल क्रेशेज, कोरडवाहू गट, रायगड जिल्हा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थांचे फेडरेशन, आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटना, महिला-बाल हक्क अभियान, सोपेकॉम (पुणे), मोलकरीण व घरेलू कामगार संघटना (औरंगाबाद), खोज (अमरावती), रिसपॉन्स्, सम्यक

# ७. रोजगाराची हमी

कामाचा हक्क हा मूलभूत अधिकार आहे आणि रोजगारक्षम नागरिकांना रोजगार पुरवला जात आहे याची हमी घेणे हे शासनाचे काम आहे. महाराष्ट्रात रोजगार हमी कायदा १९७७ साली पास करण्यात आला. जी व्यक्ती कामाची मागणी करेल तिला संबंध वर्षात अकुशल काम देण्यात येईल अशा मोठ्या आश्वासनाची घोषणा या कायद्याद्वारे करण्यात आली. तरीही आमचा अनुभव असा आहे की, काम मिळण्याचा हक्क नेहमीच नाकारला गेला आहे. सुरुवातीला कामगार संघटना आणि जनसंघटना यांनी केलेले लढे आणि त्यांनी लावून धरलेली मागणी यामुळे काही प्रमाणात कामगारांच्या हक्कांचे संरक्षण झाले, पण त्यानंतरच्या काळात कामगारांनी मागणी करूनही प्रचंड भ्रष्टाचार, पद्धतशीर दुर्लक्ष, बड्या बागायतदारांचा दबाव यामुळे सोयीस्करपणे दिरंगाई करून शासनाने रोजगार हमी कायदा निकामी करण्याची तरतूद केली. केंद्राने गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा केल्यानंतर तर या कामांची स्थिती आणखीच विस्कळीत झाली. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार कायद्यात म. ग्रा. रोजगार हमी कायदा आणि रा. ग्रा. रो. ह. कायदा या दोन्ही कायद्यांच्या तरतुदींचा समावेश आहे. या कायद्यानुसार प्रत्येक व्यक्तीला वर्षभर काम पुरवण्याची हमी देण्यात आलेली आहे. पण प्रत्यक्षात राज्याने आपली जबाबदारी झटकून टाकलेली आहे. अर्थातच म. ग्रा. रो. ह. कायद्याच्या तरतुदी बऱ्यापैकी सर्वसमावेशक आहेत. त्यांची योग्य अंमलबजावणी केली गेली, तर अकुशल कामगारांना किफायतशीर रोजगार दीर्घकाळ पुरवण्याचे मोठे काम होऊ शकेल. म्हणून आम्ही अशी मागणी करतो की, म. ग्रा. रो. ह. कायद्याच्या तरतुदींची तत्त्वतः आणि अक्षरशः अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी. अधिक तपशीलवार मागणी अशी -

## १) आवश्यक निधीची खात्रीशीर तरतूद करून तो निधी उपलब्ध करून द्या आणि त्याचा योग्य प्रकारे उपयोग करा.

• १९७७ सालात रोजगार हमी योजनेसाठी खास निधी उभारला जाणे ही एक अद्वितीय घटना होती. ग्रामीण भागातील अकुशल कामगारांसाठीच्या रो. ह. कायद्याकरता निधी निर्माण करण्यासाठी संघटित कामगारांनी एक अभूतपूर्व पाऊल उचलले आणि व्यवसाय करातून आपला सक्रिय सहभाग नोंदवला. या निधीत शासनाने तेवढीच रक्कम घालावी अशी अपेक्षा होती. महत्त्वाचे म्हणजे हा निधी त्याच कामासाठी अधोरेखित केलेला होता. म्हणजे हा निधी फक्त रो. ह. यो. च्या



खर्चासाठीच वापरावयाचा होता. आणि हा निधी सर्वसाधारण निधीत वळवला जाऊ शकत नव्हता. त्याहूनही अधिक म्हणजे खर्च न झालेला निधीसुद्धा सर्वसाधारण निधीत वळवता येऊ शकत नव्हता. उरलेला निधी रो. ह. यो. निधीतच साठत राहणार होता आणि भविष्यकाळातील अनपेक्षित कामासाठी वापरला जावा अशी तरतूद होती. या यंत्रणेमुळे रो. ह. यो.साठी निधीची कमतरता पडणार नाही अशी शाश्वती निर्माण झाली होती. सुरुवातीला शासनाने आपला तेवढाच वाटा दिला होता आणि पुरेसा आवश्यक निधी तयार झाला होता. पण नंतरच्या वर्षात शासनाने आपला तेवढाच वाटा आणि शिल्लक निधी सर्वसाधारण निधीत वळवला आणि रो. ह. कायद्याच्या तरतुदींचा भंग केला. २००८ सालात शासनाने संरक्षित रो. ह. यो. निधीची संकल्पनाच मोडीत काढली. त्याऐवजी दरसाल २०० कोटी रुपये म. ग्रा. रो. ह. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ठेव म्हणून देण्याचे आश्वासन दिले. पण शासनाने आपल्या आश्वासनापासून पळ काढला आहे. २००९-१० सालात शासनाने फक्त २३.७३ कोटी रुपये ठेवले. २०१२-१३ सालात जमा निधी ३७५.८८ कोटी रुपये असताना शासनाचा वाटा आश्वासनाच्या २० टक्केसुद्धा नव्हता. त्याशिवाय-

• केंद्राकडून मिळणाऱ्या निधीसह मूळच्या रो. ह. कायद्यातील तरतुदीनुसार या कामासाठीचा रो. ह. यो. निधी जमा होतच राहिलेला आहे. राज्य शासनाच्या आश्वासनाप्रमाणे तेवढाच वाटा त्याचप्रमाणे शासनाच्या वाट्याची थकबाकी रक्कम आणि दरसाल मिळावयाची रु. २००० इतका निधी मिळण्याची खात्री करून घ्यायला हवी. आश्वासन दिलेली रक्कम जमा करायला शासन अपयशी का ठरले त्याचे उत्तर शासनाने द्यायला हवे. या अधोरेखित निधीतून पैसे दुसरीकडे वळवले जाणार नाहीत याची खात्री करून द्यायला हवी.

• केंद्रशासनाच्या तरतुदींनुसारच रो. ह. यो. निधीतून सर्व स्तरांवर निधीचे वाटप झाले पाहिजे. म्हणजे मग वर्षाचे ३६५ दिवस काम पुरवता येईल. संबंध वर्षभर कामाची शाश्वती निर्माण करण्यासाठी नियम आणि पद्धत घालून दिलीच पाहिजे.

• कामाची मागणी निर्माण करा. केंद्र शासनाने दिलेला सर्व निधी खर्च करा. २०१२-१३ सालात रु. २२८ कोटींहून अधिक रक्कम (अंदाजे आराखड्याच्या १३%) खर्च केलाच नाही.

## २) सार्वत्रिकीकरण

• सबंध वर्षभर सर्वांना काम द्या. मर्यादित, लक्ष्याधारित लोकच लाभार्थी म्हणून ठरवले नसले, तरी वेगळ्याच प्रकारचे लक्ष्याधारित वर्गीकरण म. रा. ग्रा. रो. ह. कायद्याच्या अंमलबजावणीत दिसून येते. त्यामुळे कामाच्या हक्काचा उपभोग घेण्यावर मर्यादा पडत आहे. या कायद्याची अंमलबजावणी केली जात असताना १०० दिवसच कामाची हमी दिली जात आहे. म्हणजे वर्षाच्या २८% पेक्षाही कमी काळासाठी कामाची हमी दिली जाते. गंमत म्हणजे १०० दिवस कामाची हमी प्रत्येक

व्यक्तीला दिली जात नाही, तर दर कुटुंबाला दिली जात आहे. समजा, एका कुटुंबात तीन धडधाकट प्रौढ व्यक्ती असतील तर त्यातल्या एका व्यक्तीला म. रा. ग्रा. रो. ह. कायद्यानुसार वर्षाच्या ९ टक्के काळासाठी कामाची हमी दिली जाते. रो. ह. योजनेची कामे शेतीच्या हंगामात काढली जात नाहीत. त्याशिवाय म. रा. ग्रा. रो. ह. कायदा शहरी बेरोजगारांच्या बाबतीत पक्षपात करतो. शहरी बेरोजगारांना अजिबात कुठलीच हमी देत नाही. गेल्या वर्षी नियोजन मंडळाने १४६ क वर्ग नगरपालिका कौन्सिल्स्मध्ये म. गा. रो. ह. कायद्याची अंमलबजावणी करण्याचे ठरवले आणि त्यासाठी १०० कोटी रु. मंजूर केले. त्याची कार्यवाही याप्रमाणे-

• ज्याला कामाची गरज आहे आणि जो काम मागेल त्याला प्रत्येक कुटुंबात १०० दिवस काम म. ग्रा. रो. ह. कायद्यानुसार वर्षात केव्हाही द्यावे.

• विभागनिहाय लोकांच्या गरजांचा अंदाज घेऊन लोकांना उचल घ्यावी लागू नये व स्थलांतर करणाऱ्या मजुरांना हंगामी गुलामगिरी पत्करावी लागू नये अशा पद्धतीने पावसाळ्यासकट संबंध वर्षभराच्या कामांची आखणी करावी.

• कामगारांकडे रोजगार कार्ड नसले तरी अथवा रोजगार कार्डाचे नुतनीकरण केले नसले तरी जो मागेल त्याला काम द्यावे. काम दिल्याबरोबर या योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने अशा मजुरांना रोजगार कार्ड बनवून द्यावे.

• सर्व १४६ क वर्ग नगरपालिकांमध्ये ताबडतोब कामाचा आराखडा बनवून आणि निधीचा वापर करून रोजगार हमीची कामे उपलब्ध करून द्यावीत आणि सर्व शहरांमध्ये या योजनेचा विस्तार करण्याची तरतूद करावी. कामांचे आराखडे बनवावे.

### ३ ) खाजगीकरण नको... त्याऐवजी व्यवस्था बळकट करा.

• रोजगार हमी योजनेला खीळ घालण्याचा अत्यंत परिणामकारक मार्ग म्हणजे योग्य वेळी कामे सुरू न करणे. या दिरंगाईवर मात करण्याची कुवत कामगारांमध्ये नसल्यामुळे जगण्यासाठी त्यांना स्थलांतर करणे भाग पाडले जाते. आणि मग जेव्हा काम सुरू केले जाते, तेव्हा कामगारांची कमतरता असल्याचा दावा अंमलबजावणी यंत्रणा करणे. पगार मिळण्याला होणाऱ्या विलंब (तीन ते चार महिन्यांहून अधिक विलंब नेहमीचाच) आणि पगाराची अनिश्चित रक्कम यामुळे कामगार रोजगार हमी योजनेपासून दूर जात आहेत. महाराष्ट्रात सध्या या कायद्यानुसार मिळणारे वेतन १६२ रु. आहे. अनेक राज्यांमधील वेतनापेक्षा ते खूपच कमी आहे. (म्हणजे रु. २१४-हरियाणा, रु.१८४-पंजाब, रु.१८०-केरळ, रु. १७८-गोवा) आणि बाजारातील चालू वेतन दरापेक्षा बरेच कमी आहे. कायद्यात तरतूद असूनही बेरोजगार भत्ता मिळवणे जवळजवळ अशक्यच आहे. त्यामुळे स्थलांतरित मजूर क्रूर कंत्राटदारांकडून पिळून काढलेल्या अवस्थेत घरी परतत. असे असले तरी आणि कंत्राटदार शासनाला बळी पडत असले तरीही ते हरित प्रदेशाकडेच जातात. कारण तेथे त्यांना निदान खर्ची तरी



मिळते. रोजगार हमीची कामे योग्यवेळी सुरू होण्याची तरतूद करून झालेल्या कामाच्या वेतनाचे वाटप वेळेवर करणे यांचे पालन काटेकोरपणे झाले पाहिजे. तरच स्थलांतर करणारे कामगार पुन्हा रोजगार हमीकडे बळ धरेल. हे करण्यात कुचराई करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई झाली पाहिजे.

याशिवाय,

• खाजगी कंत्राटदारांवर बंदी :

• रोजगार हमी योजनेतील कामांवर ठेकेदारांना बंदी करणाऱ्या तरतुदींची कठोर कारवाई करावी.

• वेतन आणि इतर भत्ते :

• वेतन : रो. ह. यो. च्या निधीचा उपयोग प्रत्यक्ष कामगारांचा खर्च करण्यासाठीच व्हावा. त्यासाठी साधनसामग्रीवरील खर्चाचे प्रमाण ६०:४० असावे.

• रोजगार हमी योजनेतील किमान वेतन शेतीक्षेत्रातील वेतन पायाभूत धरून ठरवलेले आहे. पण शेतीक्षेत्राशिवाय कामगार बांधकाम, जंगलातील कामे, पाटबंधारे इत्यादी क्षेत्रातसुद्धा काम करत असतात. तिथले किमान वेतन बरेचसे जास्त आहे. म्हणून ज्या क्षेत्रातील काम रोजगार हमी योजनेतून कामगारांना दिले जाईल त्या क्षेत्रातील किमान वेतनानुसार त्यांना वेतन दिले जावे.

• शास्त्रशुद्ध पद्धतीने काळ, काम वेगाच्या आधारावर केलेल्या अभ्यासानूसार वेतन दरात वाढ करावी. दरवर्षी वेतनाचे पुनरावलोकन आपोआप होण्याची शाश्वती निर्माण करण्यासाठी राहणीमान निर्देशांकाशी वेतनाची सांगड घाला.

• सामाजिक सुरक्षेसाठी राखून ठेवलेल्या रक्कमेत आवश्यक ती वाढ करा म्हणजे -

अ) ज्या कामगारांना त्यांच्या वस्तीपासून ५ कि.मी. पेक्षा दूर काम दिले जाईल त्यांना २० टक्के अतिरिक्त निर्वाह भत्ता द्यावा.

ब) रोजगार हमी योजनेच्या कामावर जी स्त्री कामावर असेल (म्हणजे आधीच्या वर्षात एक महिना) तिला बाळ तपासणीची पगारी रजा मिळाली पाहिजे.

• योग्य वेळी कामाचे नियोजन आणि पारदर्शक पद्धतीने व तत्परतेने वेतनाचे वाटप वेळेवर होण्यासाठी आंध्रप्रदेश पद्धतीचा वापर करावा. वेतन वाटपातील दिरंगाई कमी करण्यासाठी कामाचे मोजमापांचे हिशेब करण्याचा पगार पत्रक तयार करणाऱ्या तंत्रज्ञ अधिकाऱ्यांचे सक्षमीकरण करावे. नोंदणी करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण द्यावे. वेतन वेळच्या वेळी मिळेल याची शाश्वती निर्माण करण्यासाठी बँकांच्या विस्तारित सोयी करणे व्यावसायिक मध्यस्थ नेमणे इत्यादी गोष्टी कराव्या.

**• कामाचे योग्य नियोजन -**

पुरेशी उत्पादक 'तयार ठेवा' कामे पूर्ण होण्यास लागणारा कालावधी लक्षात

घेऊन त्यानुसार वेगवेगळ्या कामांची आखणी केली पाहिजे. सुरू केलेल्या कामांची गुणवत्ता बिघडू न देता ती कामे टप्प्यांनी करवून घेतली पाहिजेत.

म.ग्रा.रो.ह कायद्याअंतर्गत असलेल्या कामांवर किमान कामाचे दिवसांइतकी तरी ती चालू राहतील अशीच कामे काढली पाहिजेत. अशी सक्ती शासकीय विभागांवर करा.

• **कार्यालयीन यंत्रणा -**

▪ सर्व रिकामी पदे भरा - (उदा. रोजगार हमी योजनेच्या कामांशी थेट संबंधित निरनिराळ्या खात्यांमधील कारकून तंत्रज्ञ अधिकारी, ग्राम रोजगार सेवक, कनिष्ठ अभियंते, विस्तार अधिकारी (उदा. सार्वजनिक बांधकाम विभाग))

▪ पंचायत समिती स्तरावरील तंत्रज्ञ, अधिकारी वर्गातील पदामध्ये वाढ करा.

▪ कामाचे प्रस्ताव (म.ग्रा.रो.ह. कायद्यातील प्रचलित मार्गदर्शन तत्त्वानुसार) तयार करण्यात ग्रामपंचायतींना मदत करणारी यंत्रणा (म्हणजे समूहाला मदत करणारी टीम) निर्माण करा.

▪ ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद स्तरावर होणाऱ्या कार्यकालीन खर्चासाठीच्या निधीत वाढ करा.

▪ सर्व कंत्राटे देणाऱ्या अधिकाऱ्यांना (उपप्रकल्प अधिकारी, तंत्रज्ञ अधिकारी, आकडेवारी नोंदणी करणारे कर्मचारी) कारकुनांना प्रशिक्षण द्या आणि त्यांच्यात कौशल्य विस्तारीत करा.

▪ ग्रामसेवकांच्या मानधनात पगार पत्रकातील रकमेच्या २.२५ टक्क्यांवरून ३ टक्के इतकी वाढ करा आणि नियमितपणे प्रवास भत्ता द्या.

## ४) जबाबदारी आणि देखरेख प्रक्रिया मजबूत करा –

• महाराष्ट्राच्या रोजगार हमी योजनेत 'रोजगार हमी- अर्धी तुम्ही आम्ही' असा मंत्र प्रचलित आहे. भ्रष्टाचार हाडीमासी मुरलेला आहे. खोटी हजेरी पुस्तके तयार केली जातात. अस्तित्त्वातच नसलेल्या कामांवर करोडो रुपये खर्च केले जातात. घोटाळे उघडकीस आणण्यास ग्रामसेवक व रोजगार हमी योजनेशी संबंधित कर्मचाऱ्यांकडून तीव्र अडथळे आणले जातात. कधी कधी ते संपच पुकारणे अशी रोजगार हमी योजनांची कामे सुरू करण्यास नकार देणे या मार्गांचा अवलंब करतात. त्यांच्यावर कठोरपणे कारवाई करण्याऐवजी महाराष्ट्र सरकार बघ्याची भूमिका घेते आहे.

म.रा.ग्रा.रो.ह. कायद्यात उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठीची यंत्रणा म्हणून सामाजिक लेखा परीक्षणाचा समावेश केला गेला आहे. (आंध्रप्रदेशसारख्या राज्यांमध्ये खास सामाजिक लेखा परीक्षण विभाग निर्माण केले गेले आहेत. पण



तिथेही सामाजिक लेखा परीक्षणाची प्रक्रिया नियमित आणि सुरळीतपणे होत नाही. लोकांच्या दबावाखाली अधूनमधून सामाजिक लेखा परीक्षणे केली जातात.) खरं पाहिले तर ज्यांनी सामाजिक लेखा परीक्षण करायचे असे बहुतांश लोक निरक्षर असतील आणि ज्यांचे लेखा परीक्षण करायचे त्यांच्याच ताब्यात सर्व दस्तऐवज असतील तर असे सामाजिक लेखा परीक्षण म्हणजे असंघटित आणि पीडित कष्टकऱ्यांची क्रूर थट्टाच ठरते. म्हणून बळकट कामगार संघटनांनी निर्माण केलेला दबावच फक्त भ्रष्टाचाराला आळा घालू शकेल व त्याला प्रतिबंध करू शकेल.

• बँकेमार्फत वेतन देणे ही काही भ्रष्टाचार आणि दिरंगाई वरील जादूची कांडी नाही, बँकेची पासबुके नीट भरलेली नसतात. गरीब, निरक्षर मजूर 'दलालांवर' अवलंबून असतात. दूरच्या बँकेमध्ये जाण्यात आणि रांगेत उभे राहण्यात दिवसाचा रोजगार बुडतो. बँकेचे लबाड कर्मचारी पगार वाटपाआधी रोजगार हमी योजनांच्या वेतनाचा पैसा वित्तीय बाजारात लावतात!

• त्यानंतर देखरेख म्हणे शवविच्छेदन नव्हे, नियमित देखरेखीमुळे वेतनाचे योग्य तऱ्हेने वाटप आणि गुणवत्ता पूर्ण काम यांची शाश्वती निर्माण होते.

• खेड्यांपासून विभागीय पातळीपर्यंत परिणामकारक सामाजिक लेखा परीक्षण यंत्रणा निर्माण करा. कामगार संघटनांना सामाजिक लेखा परीक्षण करण्याचे अधिकार द्या. आढळलेल्या गैरव्यवहारांवर ताबडतोब कारवाई करण्यासाठी खास तरतूद करा. सामाजिक लेखा परीक्षणासाठी प्रशिक्षण कार्यक्रम करा. खेड्यात घेण्यात आलेल्या सर्व कामांच्या कागदपत्रांची एक प्रत ग्रामपंचायत कार्यालयात मिळण्याची व्यवस्था करा. सामाजिक लेखा परीक्षण मंडळात सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश करा. अपूर्ण कामांसह सर्व कामांच्या सामाजिक लेखा परीक्षणाचे वेळापत्रक जाहीर करा. अपूर्ण कामांची जबाबदारी कोणाची आहे ते निश्चित करा.

• कामांची देखरेख एकाच वेळी करा.

• तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करा. सर्व तालुक्यांत आणि जिल्ह्यांत तक्रार निवारण अधिकाऱ्यांच्या नेमणुका करा. या अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी कामगार संघटना, जनसंघटना, स्वयंसेवी संस्था यांच्या सेवकांना अधिकृत करा. सामाजिक लेखा परीक्षणाच्या वेळी तक्रार निवारण अधिकाऱ्यांनी हजर असलेच पाहिजे असे आदेश त्यांना द्या.

• सरकारी कर्मचारी आणि पंचायत सदस्यांवरील भ्रष्टाचाराच्या तक्रारींबाबतच्या चौकशीची प्रक्रिया जलद आणि पारदर्शकपणे होईल अशी शाश्वती निर्माण करा. चौकशी अहवाल जाहीर करा. निर्णयांवर अपील करण्यासाठी यंत्रणा असावी, गुन्ह्यांना वाचा फोडणाऱ्यांना पुरेसे संरक्षण देण्याची तरतूद असावी. जेव्हा सकृत दर्शनी पुरावा असेल तेव्हा चॅप्टर केस भरली जावी आणि भ्रष्टाचाराचा आरोप

असणाऱ्यांकडून बाँड घेतला जावा.

• जिल्हास्तरावर रोजगार हमी देखरेख समित्या स्थापन करा. अशा समित्यांवर सामाजिक कार्यकर्त्यांच्या नेमणुका कराव्या. कामांच्या ठिकाणी नियमितपणे तपासणी होण्यासाठी सुयोग्य यंत्रणा तयार करा.

• जिल्हास्तरीय देखरेख समित्यांच्या सदस्यांना आणि खुद्द कामगारांसह इतर संबंधितांना तांत्रिक प्रशिक्षण (कामांची मापे घेण्यासकट) द्या. कामांची मोजमापे घेणे आणि पगाराचे हिशोब करणे या प्रक्रियेची माहिती जाहीर करा.

• कामाच्या ठिकाणी कामाच्या दराचे फलक लावले जातील याची खातरजमा करा.

• पगार वाटण्यापूर्वी हजेरी पत्रकाचे वाचन झाले पाहिजे.

• पोस्ट ऑफिसेस आणि बँका यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी यंत्रणा तयार करा. कामगारांना पगारपत्रिका द्या. त्यावर केलेल्या कामाची मापे आणि कमावलेला पगार यांची नोंद असावी. पासबुकात पगाराच्या रकमेची नोंद झालीच पाहिजे अशी सक्ती करा.

• वेबसाईटवर खरी आणि नेमकी माहिती टाकली जाईल याची काळजी घ्या. एम.आय.एस. (MIS) अद्ययावत आकडेवारी नोंदली जाईल यासाठी योजना करा.

## ५) कामांची गुणवत्ता आणि मालमत्ता निर्मिती यावर भर द्या.

• रोजगार हमी कायद्याची दोन उद्दिष्ट आहेत. ग्रामीण भागातील मजुरांना काम पुरवणे एवढेच उद्दिष्ट नाही; तर त्या मजुरांच्या श्रमातून मालमत्ता निर्मिती झाली पाहिजे. त्यामुळे त्यांची उत्पादन क्षमता वाढून शाश्वत उपजीविकेचे साधन निर्माण होईल पण प्रत्यक्षात कामगारांचे श्रम आणि उद्दिष्टे यात फारच थोडे किंवा जवळ जवळ काहीच नाते नाही. एकात्मिक नियोजनाचा अभाव आहे. अशी तशीच कामे काढली जातात. आणि जी कामे होतात त्यात गुणवत्ता फारच कमी असते. ९९७५० पैकी १६% पाणलोट क्षेत्र विकास आणि ९.५% दुष्काळ प्रतिबंधक कामे पूर्ण झाली. पण मुळात त्या कामांच्या उपयुक्ततेबद्दलच प्रश्न विचारले जात आहेत.

• सुरू केलेली सर्व कामे पूर्ण होतील अशी शाश्वती द्या. प्रत्येक ग्रामपंचायतीत अपूर्ण कामांबद्दलचा संपूर्ण तपशील जाहीरपणे द्या.

• जी कामे करायची आहेत त्यांची निवड आणि प्राथमिकता ग्रामसभेत ठरवली जाईल याची शाश्वती द्या. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये क्षमताबांधणी परिणामकारकपणे होईल.

• डोंगराळ भाग, खूप पावसाचा भाग आणि निकृष्ट भाग यात कोणती कामे योग्य आहेत आणि कोणती अयोग्य आहेत यांच्या याद्या सगळ्या पंचायत समित्या आणि



ग्रामपंचायतींना द्या. त्यामुळे त्यांना कामांची निवड करण्यास मदत मिळेल. जमिनीचा पोत टिकवण्यासाठी जी कामे केली जातात. (म्हणजे मोठे खड्डे खणणे त्या सर्व कामांच्या गुणवत्तेचे लेखा परीक्षण करा. चर खणणे आणि यासारखी इतर कामे पूर्ण केली जातील याची शाश्वती द्या.

• ज्या मालमत्ता बांधल्यापासून १ वर्षाच्या आत कोसळतात किंवा दुरुस्त करण्यापलीकडे जातात त्यांची जबाबदारी कुणावर ते निश्चित करा. अशा कामचुकार अधिकाऱ्यांकडून त्या मालमत्तांची किंमत वसूल करा.

• सामाजिक सेवा देणाऱ्या सर्वांचा (म्हणजे आशा, माध्यान्ह भोजन तयार करणारे स्वयंपाकी) म. रा. ग्रा. रो. ह. योजनेत सामील करून घ्या. म्हणजे त्यांना किफायतशीर रोजगाराची शाश्वती मिळेल.

## ६) परीक्षाबाहेरील विभागांना प्राधान्य

• जरी म. ग्रा. रो. हमी कायद्यासाठीच्या खर्चात बरीचशी वाढ झालेली आहे. (२००९-१० मधील रु. २५३ कोटीवरून २०१२-१३ सालासाठी रु. २१७७ कोटी इतकी) तरी ती वाढ फसवी आहे आणि भूमीहीन मजुरांना त्याचा लाभ मिळत नाहीये. जेव्हा १९९१ सालापासून बागायती कामांचा रो. ह. यो. त समावेश झाला तेव्हापासून भूमीहीन मजुरांच्या बदल्यात वैयक्तिक लाभाच्या योजनांमधून मध्यम व बड्या शेतकऱ्यांनाच लाभ मिळाला आहे. आज रो.ह.यो.च्या फंडाचा बराचसा भाग वैयक्तिक विहिरी बांधण्यावर खर्च केला जात आहे. त्यामुळे सार्वजनिक कामांवरची गुंतवणूक कमी झाली आहे. त्याऐवजी परिघाबाहेरील विभागांना या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. ६.७ लाख रोजगार कार्डांपैकी फक्त १.१५ लाख अनुसूचित जातीच्या कुटुंबांकडे रोजगार कार्डे आहेत आणि ९.१९ रोजगार कार्डांपैकी २.६९ लाख अनुसूचित जमातींच्या कुटुंबाकडे रोजगार २०१२-१३ सालात मिळाला आहे.

• आदिवासी आणि दलित विभागांसाठी रो. ह. यो. कामांपैकी किमान उद्दिष्ट (खास वेळापत्रकासह) निश्चित करा.

• रो. ह. यो. खालील वैयक्तिक कामांच्या योजनांच्या लाभाच्या फायद्यासाठी आदिवासी दलित आणि लहान व परिघाबाहेरील शेतकरीच फक्त पात्र असावेत.

• ५०% कामांची निवड महिला ग्रामसभेत केली जावी. ती कामे स्त्रियांच्या कंटाळवाण्या कामाचा भार हलका करणारी असावीत. उदा. सरपण गोळा करणे, पाणी आणणे, गुरांसाठी वैरण आणणे इत्यादी.

• सर्व कामांच्या ठिकाणी पाळणाघरे चालवण्याची व्यवस्था करावी.

• ज्यांची म. रा. ग्रा. रो. ह. कायद्यानुसार नोंदणी झाली आहे आणि ज्यांनी या कायद्याअंतर्गत किमान दिवस काम केले आहे अशा सर्व व्यक्तींना वृद्धावस्था पेन्शन लागू करा.

लागणाऱ्या निधीसाठी राज्य व केंद्र सरकारने हातभार लावावा.

➢ **या सामाजिक सेवांसाठी सरकारकडे पुरेसा पैसा नाही असे सांगितले जाते. पण**

• विकसित देशात सरकारचे कर उत्पन्न राष्ट्रीय उत्पादनाच्या २५ ते ४०% आहे. पण भारतात ते फक्त १७% आहे.

• कंपन्यांना, श्रीमंतांना लाखो कोटी रु. कर-सवलती सरकार देत आहे. उदा. २०१२-१३ मध्ये कॉर्पोरेटस् व श्रीमंतांना आयकरात १,१३००० कोटी रु. सूट तर आयात व अबकारी करात ४.६०,००० कोटी रु. सूट दिली.

• चांगल्या चालणाऱ्या, मोठा नफा मिळवून देणाऱ्या सरकारी कंपन्यांचे शेअर्स कवडी-मोलाने खाजगी कंपन्यांना विकत आहे. उदा. ५००० कोटी पेक्षा जास्त किमतीची बाल्को कंपनी स्टरलाईट कंपनीला फक्त ५५० कोटी रुपयांना विकली; ३००० कोटींपेक्षा जास्त रोख रक्कम असणारी आणि भारतात अनेक ठिकाणी मालमत्ता असलेली व्ही.एस.एन.एल. कंपनी टाटांना फक्त २५९१ कोटी रुपयांना विकली.

• देशाची नैसर्गिक संपत्ती कवडी-मोलाने खाजगी कंपन्यांना विकत आहे. उदा. कोळसा-खाणीं साठींचे परवाने देण्यात खाजगी कंपन्यांवर मेहेरनजर केल्याने सरकारचे १.८६ लाख कोटी रुपये म्हणजे राष्ट्रीय उत्पादनाच्या सुमारे २% उत्पन्न बुडाले ! रिलायन्स कंपनीला अकारण गॅसचा दर दुप्पट करून दिल्यामुळे येत्या ५ वर्षात त्यांना ४ लाख कोटी रु. आयते मिळतील.

• अनेक मोठ्या कंपन्यांनी सार्वजनिक बँकांची लाखो कोटी रु. ची कर्जे बुडवली व त्यावर सरकारने पाणी सोडले आहे !

➢ **या पार्श्वभूमीवर आम्ही मागणी करतो की,**

• या कंपन्यांना, श्रीमंतांना लाभ देणारे कराबाबतचे धोरण बदलून त्यांच्याकडून पुरेसे कर उत्पन्न मिळवा व हे वाढीव कर-उत्पन्न सामाजिक सेवांवर अग्रक्रमाने खर्च करायचे ठरवा.

• सरकारी खर्चाचा ठराविक हिस्सा सामाजिक सेवा/सुरक्षा यासाठी खर्च करायचे बंधन घालून घ्या.

• नफ्यात चालणाऱ्या सरकारी कंपन्यांची विक्री थांबवा. सरकारी प्रकल्प, कंपन्यांची उत्पादने खाजगी हितसंबंधियांना कमी किंमतीत विकण्याऐवजी त्यांच्या



वरकडाचा उपयोग सामाजिक सेवा पुरवण्यासाठी अग्रक्रमाने वापरा.

• देशाची नैसर्गिक संपत्ती कवडी-मोलाने खाजगी कंपन्यांना विकणे बंद करा. या संपत्तीचा दूर-पल्ल्याची उद्दिष्टे ठेवून सार्वजनिक क्षेत्राद्वारे नियोजनबद्ध वापर करत त्यातून पुरेसे उत्पन्न मिळवा. ते सामाजिक सेवांसाठी अग्रक्रमाने खर्च करा.

• जंगल-संपत्तीबाबत स्थानिक, आदिवासी जनतेच्या सहभागानेच त्याचा विकास करा. शाश्वत पद्धतीने विकास करून जे वरकड उत्पन्न मिळेल त्याचा सामाजिक सेवांसाठी अग्रक्रमाने खर्च करा.

**२. सार्वजनिक सेवा पुरवताना 'टार्गेटिंग' करण्याचे थांबवा. कोणत्याही कार्डाची वा इतर अट न घालता आरोग्य-सेवा, शिक्षण, घरगुती वापरासाठी पाणी आणि सार्वजनिक स्वच्छता या सामाजिक सेवा सर्वांना मोफत द्या. सार्वजनिक सेवांमधून, सुरक्षा-कवचातून कोणालाही वगळू नका. उदा.**

• रेशनिंग-व्यवस्था सर्वांसाठी कोणत्याही कार्डाची किंवा इतर अट न ठेवता ती सर्वांसाठी ठेवा.

• घोषित, अघोषित असा भेदभाव न करता सर्व-प्रकारच्या वस्त्यांना सर्व नागरी सुविधा देणे बंधनकारक करा.

• ० ते १८ वयोगटातील सर्वांना मोफत, दर्जेदार शिक्षण देण्याची व्यवस्था उभारा. कोणालाही शिक्षण-हक्कातून वगळू नका.

• असंघटित क्षेत्रातील श्रमिकांनाही पेन्शन देऊन पेन्शनचे सार्वत्रिकीकरण करा.

**३. सामाजिक सेवा पुरवणाऱ्या सार्वजनिक यंत्रणांचे खाजगीकरण, कंत्राटीकरण, खच्चीकरण, थांबवा. त्यांचे बळकटीकरण करून त्यांच्यात पुरेशी वाढ करा.**

• सार्वजनिक सेवांचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष खाजगीकरण थांबवा. त्यांना 'आर्थिक-दृष्ट्या स्वावलंबी' बनवण्याची म्हणजे त्या बाजारपेठी नियमांनी चालवायची भाषा बंद करा.

• सर्व जनतेला सर्व सामाजिक सेवा पुरवण्यासाठी आजच्या भारतीय परिस्थितीत काही बाबतीत काही प्रमाणात खाजगी संस्थांचे सहकार्य घेणे आवश्यक असले (उदा. आज ९०% डॉक्टर्स खाजगी आहेत.) तरी सार्वजनिक यंत्रणाच या सेवांचा कणा असतील, नेतृत्वात असतील असे धोरण घ्या. शासकीय शाळा, दवाखाने इ. सर्व सार्वजनिक सेवा बळकट करा.

• कायमस्वरूपी काम करणाऱ्या सर्व कंत्राटी कामगारांना कायम करा. या यंत्रणातील विशेषतः कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करा. त्यांचे निरंतर शिक्षण करण्यासाठी त्यांचा सहभाग असणारी व्यवस्था उभारा.

• सार्वजनिक सेवा क्षेत्रातील सर्व रिक्त पदे ताबडतोब व पारदर्शी पद्धतीने भरा.

• सेवा पुरवणाऱ्या सार्वजनिक यंत्रणांचे अंतर्गत लोकशाहीकरण करा. या संस्था चालवण्याच्या प्रक्रियेत कर्मचारी/कामगार यांचा सहभाग घ्या. त्यासाठी त्यांचे सक्षमीकरण करा.

• या सेवांबाबतच्या निर्णयांचे केंद्रीकरण व खाजगी हितसंबंधियांचा हस्तक्षेप थांबवा. निर्णय-प्रक्रिया पारदर्शी व उत्तरदायी करा.

• सार्वजनिक - खाजगी भागीदारी या नावाखाली सरकारचे पैसे खाजगी खिशात घालण्याचा कार्यक्रम बंद करा. जिथे आवश्यक असेल तिथेच सामाजिक भूमिकेतूनच करार करा. अशा करारांमुळे सार्वजनिक-सेवा बळकट होतील, दुबळ्या होणार नाहीत हे सुनिश्चित करा. अशा करारांमार्फत होणारे सर्व व्यवहार, करार पारदर्शी, सामाजिक निकष पाळणारे असतील व लाभार्थी जनतेला थेट उत्तरदायी असायला हवे हे धोरण घ्या.

• मोकाट सुटलेले खाजगी क्षेत्र हे सार्वजनिक क्षेत्रावर दुष्परिणाम करते. म्हणून बाजारपेठी पद्धतीने सेवा पुरवणाऱ्या खाजगी कंपन्या वा ट्रस्ट यांच्यावर सामाजिक नियंत्रण आणा. त्यांचे अधिकाधिक सामाजिकीकरण करण्याचे धोरण आखा.

### ४. सामाजिक सेवा लोकांप्रती उत्तरदायी करण्यासाठी 'लोकाधारित देखरख' व या सारख्या कार्यक्रमांचे सार्वत्रिकरण करा.

• ज्या लोकांसाठी या सेवा आहेत त्यांचा या सेवांवर देखरेख ठेवण्यात थेट सहभाग असला पाहिजे व लोकांना थेटपणे उत्तरदायी असायला हवी हे तत्त्व मान्य करा. काही सामाजिक संघटनाच्या सहकार्याने सुमारे हजार गावांमध्ये चाललेल्या सार्वजनिक आरोग्य-सेवांवर 'लोकाधारित देखरख' या महाराष्ट्रातील अधिकृत कार्यक्रमाचा अनुभव सकारात्मक आहे. तो लक्षात घेता तो सार्वत्रिक करा. ही 'लोकाधारित देखरख' मंत्रालयासकट उच्च पातळीवरील कारभाराबाबतही अमलात आणण्याची धोरण घ्या.

### ५. सर्व सार्वजनिक सामाजिक सेवा चांगल्या दर्जाच्या, पुरेशा असल्याच पाहिजेत असे धोरण घ्या.

• सार्वत्रिकरित्या मिळणाऱ्या दर्जेदार सार्वजनिक सेवा पुरवणे हा विषमता कमी



करण्याचा एक मार्ग आहे. पण सध्या सार्वजनिक सेवा या अपुऱ्या, अनेकदा सुमार दर्जाच्या व असंवेदनशील असतात. हे चित्र बदलण्यासाठी त्या दर्जेदार, पुरेशा व जनतेप्रती जबाबदेयी असतील हे सुनिश्चित करा. उदाहरणार्थ-

• रेशनिंगमध्ये गहू, तांदूळ इ. तृण-धान्यांसोबत कुपोषणावर मात करण्यासाठी आवश्यक अशा डाळी-कडधान्ये यांचा तसाच इतर १३ जीवनावश्यक वस्तूंचा समावेश करा. तसेच स्थानिक धान्ये, उदा. ज्वारी, बाजरी, नाचणी इ. यांचाही समावेश करा. घरगुती वापरासाठी लागणारे इंधन, जळण ही जीवनावश्यक बाब आहे हे लक्षात घ्या.

• माणसांना व जनावरांना पिण्याचे पाणी शुद्ध व हानिकारक क्षार, रसायने विरहीतच मिळेल हे सुनिश्चित करा. घरगुती वापरासाठी पाणी पुरवण्याबाबत शहरे व खेडी यात भेदभाव करू नका.

• सर्वांना दर्जेदार शिक्षण मिळणे हा विषमता कमी करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण क्षमता विकसित करणारे शिक्षण सर्व मुला-मुलींना मिळायलाच हवे. ० ते १८ वयाच्या सर्व विद्यार्थ्यांना पूर्णतः मोफत, समान दर्जाचे, केंद्रीय विद्यालयांच्या गुणवत्तेचे, मातृभाषेतून शिक्षण मिळेल हे सुनिश्चित करा. शिक्षण दर्जेदार, आनंददायी, करण्यासाठी विद्यार्थ्यावरील अकारण बोजा कमी करणे, सुसज्ज वाचनालये, क्रीडांगणे उपलब्ध करणे, विद्यार्थी शिक्षक प्रमाण १५:१ करणे, समतावादी मूल्ये रुजवणारा अभ्यासक्रम व शिक्षणप्रक्रिया रुजवणे अशा प्रकारच्या सुधारणा सार्वत्रिक करा. कंत्राटी शिक्षक, शिक्षणसेवक पद्धत बंद करा.

• सार्वजनिक वाहतूक-व्यवस्था ही परवडणारी, पुरेशी हवीच पण त्याचबरोबर पुरेशी, नियोजित वेळापत्रकानुसार चालणारी, दर्जेदारही असेल अशी व्यवस्था करा. मेट्रोसारखे अति-महागडे उपाय न करता, बस-सारख्या अतिशय स्वस्त पर्यायांना प्राधान्य द्या. खाजगी वाहनांच्या वाढीवर निर्बंध घाला व त्याकरिता मोटारींवर गर्दीकर, चढे पार्किंग दर, वाहनमुक्त क्षेत्र असे उपाय लागू करा.

### ६. दलित, आदिवासी, अल्प-संख्यांक, भटके-विमुक्त, स्त्रिया अशा वंचित घटकांनाही या दर्जेदार सेवा नक्की, मिळतील हे सुनिश्चित करा. त्यासाठी खास लक्ष द्या, निकष बनवा.

• या वंचित घटकांना सामाजिक सेवा, सुरक्षा यांची सर्वात जास्त गरज असते. पण नेमके तेच अशा सेवांमधून सर्वात जास्त वगळले जातात. त्यामुळे त्यांना या सेवा

# जगण्याच्या हक्काचं आंदोलन
# सामाजिक सेवा, सुरक्षेसाठी भूमिका व मागण्या

***(रेशन व अन्न-सुरक्षा, शिक्षण, आरोग्य-सेवा, स्थानिक-वाहतूक, पेन्शन, रोजगार-हमी यांच्या हक्कांसाठी काम करणाया महाराष्ट्रातील विविध डाव्या, पुरोगामी संघटनांच्या सुमारे १५० कार्यकर्त्यांनी १०-११ ऑगस्ट, २०१३ रोजी पुण्यातील राज्यव्यापी बैठकीमध्ये केलेल्या चर्चेमध्ये सर्वानुमते ठरलेली भूमिका व मागण्या या निवेदनात आहेत.)***

शिक्षण, आरोग्य, अन्न सुरक्षा, घरगुती वापरासाठी पाणी आणि सार्वजनिक स्वच्छता, स्थानिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, पेन्शन, रोजगार हमी या सर्व सामाजिक सेवा-सुरक्षा मिळणे हा जनतेचा हक्क आहे. या सेवा पुरवण्याची व्यवस्था उभारणे ही जबाबदारी सरकारची आहे. या सर्व सामाजिक सेवा, सुरक्षा या कष्टकऱ्यांच्या सामाजिक वेतनाचा भाग आहेत. सामाजिक वेतन म्हणजे सर्वांना समान अशा सामाजिक सेवा/सुरक्षा सरकारने पुरवून त्या स्वरूपात सर्व श्रमिकांना द्यायचे एक प्रकारचे वेतन. श्रमिकांचे वेगवेगळे विभाग आपापली मजुरी/मोबदला कमावतातच. पण त्याला जोड म्हणून हे सामाजिक वेतन आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या तथाकथित 'कल्याणकारी राज्या'च्या जमान्यात असे सामाजिक वेतन विकसित देशातील श्रमिकांनी लढून मिळवले. भारतातही स्वातंत्र्य मिळाल्याची एक फलप्राप्ती म्हणजे काही प्रमाणात सामाजिक वेतन मिळू लागले. दारिद्र्य व विषमता कमी करून सर्व जनतेला समान संधी मिळून द्यायची ही भारतीय घटनेत नमूद केलेली शासनाची जबाबदारी सरकारने पार पाडायला हवी व त्यासाठी हे सामाजिक वेतन हक्क म्हणून द्यायलाच हवे अशी आमची भूमिका आहे.

सामाजिक सेवांसाठी होणारा खर्च हा सरकारी तिजोरीवर बोजा आहे असे न मानता जनतेच्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी त्या आवश्यकच आहेत. तसेच मानवी विकासासाठी आवश्यक अशी ती गुंतवणूकही आहे हे लक्षात घ्यायला हवे. तसेच पेन्शनवर म्हणजे सामाजिक सुरक्षेवर होणारा खर्च हा बोजा न मानता म्हातारपणाचा हक्क मानला पाहिजे. तीस-चाळीस वर्षे कष्ट करून प्रत्येक श्रमिक सामाजिक संपत्तीत भर घालतो व म्हातारपणीही अप्रत्यक्ष करामार्फत सरकारी तिजोरीत भर घालत असतो हे लक्षात घेता म्हातारपणी किमान जीवनमान



राखण्यासाठी, सुखाने जगण्यासाठी राष्ट्रीय उत्पानातील आवश्यक असा भाग समाजाने, सरकारने बाजूला काढून ठेवला पाहिजे. राष्ट्रीय उत्पादनात ६०% भर घालणाऱ्या, महागाईने जेरीस आलेल्या बहुसंख्य अशा असंघटित श्रमिकांसाठी तर हे सामाजिक वेतन मिळणे अत्यावश्यक आहे. पण १९९० पासूनच्या 'खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण' ('खाउजा') या धोरणाचा भाग म्हणून भारत सरकार ही जबाबदारी झटकून टाकायच्या प्रयत्नात आहे. त्याला आमचा तीव्र विरोध आहे.

***या सामाजिक सेवा-सुरक्षा मिळवण्यासाठी सर्व क्षेत्रांसाठी सामाईक अशा आम्ही खालील मागण्या करीत आहोत -***

## १. सामाजिक सेवेसाठीच्या सरकारी निधीमध्ये ताबडतोबीने भरीव वाढ करा.

विकसित देश सामाजिक सेवांसाठी राष्ट्रीय उत्पादनाच्या २०% पेक्षा जास्त रक्कम खर्च करतात. पण भारतात केंद्र व राज्य सरकार मिळून फक्त ७% रक्कम खर्च करते. काही विकसनशील देश यापेक्षा कितीतरी जास्त रक्कम खर्च करतात. उदा. थायलंड-१३%, दक्षिण आफ्रिका-१५%, बोलीव्हिआ-१७%, व्हेनेझुएला-२३%, ब्राझील-२४%. या पार्श्वभूमीवर **आमच्या मागण्या -**

## ➢ सामाजिक सेवांसाठी होणारा सरकारी खर्च ताबडतोबीने दुप्पट करा.

- आरोग्यसेवेवरचा सरकारी खर्च लगेच दुप्पट करा. नंतर दरवर्षी ५०%नी वाढवून राष्ट्रीय उत्पादनाच्या ५% करा.
- शिक्षणावरचा सरकारी खर्च राष्ट्रीय उत्पादनाच्या फक्त ३% आहे. तो ताबडतोब, वेगाने वाढवत कोठारी आयोगाने म्हटल्याप्रमाणे राष्ट्रीय उत्पादनाच्या ६% करा.
- अन्न-सुरक्षेवरील सरकारी खर्च राष्ट्रीय उत्पादनाच्या फक्त १% आहे. तो ताबडतोब दुप्पट करा.
- असंघटित मजुरांच्या पेन्शनवरील खर्च वाढवून प्रत्येक वृद्धाला दरमहा किमान २००० रु. पेन्शन मिळण्यासाठी तरतूद करा.
- देशातील सर्व शहरांमध्ये किमान रु. १ आणि कमाल रु. १० असे दर असणारी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था लागू करा. तोटा भरून काढण्यासाठी निधी पुरवण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर कायद्याने टाका. यामध्ये पायाभूत सुविधांसाठी